**महाराष्ट्राच्या राजकारणावर वेगळा ठसा उमटवणारा नेता अशी अजितदादांची ओळख होती. मोठ्या झाडाखाली छोटी झाडे तगत नाहीत; परंतु अजितदादा त्याला अपवाद होते. राज्याच्या प्रश्नांची खडानखडा माहिती आणि दूरदृष्टीने निर्णय घेणारा झुंजार नेता म्हणून त्यांची ओळख होती. दुर्दैवी विमान अपघातात त्यांचा अंत झाला. मुख्यमंत्री व्हायचे त्यांचे स्वप्न पूर्ण झाले नाही, ही रुखरुख महाराष्ट्राला राहील.**

# राजकारणापलीकडचे दादा

आदरांजली

अजित कदम



उपमुख्यमंत्री अजित पवार यांना राजकीय वारसा लाभला असला, तरी ते त्या माध्यमातून राजकारणात आले नाहीत. राजकारणी अजितदादा सर्वांना माहीत आहेत; परंतु त्या पलीकडचे अजितदादा अनेकांना माहीत नाहीत. नगर जिल्ह्यातील देवळाली प्रवरामध्ये त्यांचा जन्म झाला. अण्णा पाटील कदम हे त्यांचे मामा. दादा राजकारणात कुठेही असले, तरी त्यांनी नातेसंबंध कटाक्षाने जपले. नगर जिल्ह्यात आले, की ते आजोळी जायचे. वेळात वेळ काढून त्यांना भेटायचे. विचारपूस करायचे. विरोधी पक्षात असले, तरी अजितदादांनी राजकारण आणि नातेसंबंध वेगळे ठेवले. अन्य कुणाशी नातेसंबंध असले, तरी त्यांच्याही भेटी अजितदादा घेत. अजितदादा राजकारण्यापेक्षा माणूस म्हणून मोठे होते. अगदी अलिकडचे उदाहरण म्हणून पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या निवडणुकीकडे पाहता येईल. प्रचारासाठी जात असताना त्यांनी एक अपघात पाहिला तेव्हा तिथे थांबून अपघातातील जखमीला तातडीने रुग्णालयात पाठवले. हे अपवादात्मक उदाहरण नाही. नगर जिल्ह्यात एका अपघातातील जखमीसाठी स्वतःची गाडी थांबवली. त्या गाडीतच रुग्णाला दवाखान्यात पाठवून उपचाराची व्यवस्था केली आणि दादा दुसऱ्याच्या गाडीत पुढे निघून गेले. दादा असे माणुसकी जपणारे होते.

दादा उपमुख्यमंत्रीपदी असताना वाढदिवसादिवशी त्यांच्या मुंबईच्या बंगल्यावर जाण्याचा योग आला. सकाळी साडेसहा वाजता तिथे पोचलो, तर दादा एका बैठकीत होते. त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. आमच्यासोबत विदर्भातील काही कार्यकर्तेही आले होते. त्यांची काही सार्वजनिक कामे होती. दादांनी त्यांच्या आमदाराकडून ती जाणून घेतली आणि आमदारालाच खडसावले. या लोकांना घेऊन इतक्या लांब येण्याची काय गरज होती, त्यांना किती त्रास झाला. त्यांची कामे तिथेच व्हायला हवी होती. त्यानंतर त्यांनी या कार्यकर्त्यांची आस्थेने चौकशी केली. त्यांना नाष्ता दिला. ते कसे आले, याची माहिती घेतली. पैसे आहेत का, हे विचारले. आलाच आहात, तर आता मुंबई पहा आणि गावी जाईपर्यंत तुमचे काम झालेले असेल, असा शब्द दिला. आमदाराला बोलावून संबंधित कार्यकर्त्यांचा खर्च तुम्ही करा, असे बजावले. पैसे नसल्यास माझ्याकडून घ्या, असे सांगायला ते विसरले नाहीत. हे कार्यकर्ते मुंबईहून विदर्भात पोचण्याअगोदरच काम झाले होते. पवार कुटुंबाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे वेळ चोख पाळणे. अजितदादा त्या परंपरेत बसणारे. अजितदादा दिलेल्या सभांना वेळेवर उपस्थित राहत. अजितदादा स्पष्टवक्ते होते. काम होणार असेल, तरच 'हो' म्हणत. होणार नसेल तर तसे स्पष्ट सांगणार. नियमात बसत असेल, तरच काम करणार. नसेल होत तर तसे सांगणार. राजकारणी नेत्यांमध्ये अपवादाने आढळणारा हा गुण अजितदादांकडे होता.

आज त्यांची आठवण काढताना अनेक वर्षे मागे जायला होते. कोल्हापूर येथून शिक्षण पूर्ण करून आल्यानंतर अजितदादांनी काटेवाडीमध्ये शेती करायला सुरुवात केली. प्रारंभी त्यांनी टोमॅटोची लागवड केली. टोमॅटोचे हे पीक पाहण्यासाठी दुरून शेतकरी येत असत. त्यानंतर दादांनी शेतीक्षेत्रात विविध प्रयोग केले. दुधाचा व्यवसाय केला. जनावरांची खरेदी केली. त्या वेळी ते जनावरांसाठी बाजारातून स्वतः कडबा खरेदी करत. याशिवाय त्यांनी कुक्कुटपालन व्यवसायही केला. हे सगळे उद्योग करताना सगळी कामे ते स्वतः करत. दादांनी काटेवाडी ते कन्हेरी परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण केले. लोकांना मदत करण्याची त्यांची भूमिका आधीपासूनच पहायला मिळालेली. लोकांनी मांडलेले प्रश्न, अडीअडचणी घेऊन ते शरद पवार यांच्याकडे जात. तिथे प्रश्न मार्गी लावत असत. अशा पद्धतीने समाजकारण करता करता अजितदादा राजकारणाच्या वाटेवर येऊन उभे राहिले. वेगवेगळी खाती सांभाळताना अजितदादांनी शेतकरी हिताचे अनेक निर्णय घेतले. दादांचा राजकारणापर्यंतचा प्रवास एक प्रगतशील शेतकरी, लघुउद्योजक, संचालक, अध्यक्ष, उपमंत्री, मंत्री आणि उपमुख्यमंत्री असा टप्याटप्याने झाला. प्रत्येक पदावर उत्तम काम केल्यामुळे त्यांना पुढची संधी मिळत गेली. प्रत्येक पदाची जबाबदारी सांभाळताना दादांनी त्यांची योग्यता, गुणवत्ता सिद्ध केली. म्हणूनच वारसा म्हणून दादा राजकारणात आले किंवा त्यांना पदं मिळाली असे अजिबात झाले नाही.

अजितदादा आणि कार्यकर्ते हे समीकरण महाराष्ट्राला नव्याने सांगायची गरज नाही. एखादा कार्यकर्ता दादांशी जोडला गेला, तर मग जीव गेला तर बेहत्तर; पण दादांसाठी वाट्टेल ते करण्याची कार्यकर्त्यांची तयारी असे. कार्यकर्त्यांची कानउघडणी करताना दादांचा उद्देश कधीच चुकीचा नसायचा. लोकांची कामे व्हावीत, पक्ष पुढे जावा हेच दादांना अभिप्रेत असायचे. दादा अहोरात्र काम करून जनतेच्या प्रश्नांना महत्त्व देत. कार्यकर्त्यांनी पदावरून भांडणे दादांना पटायचे नाही. म्हणनूच ते थोडा कठोर पवित्रा घेऊन कार्यकर्त्यांना तंबी देत. दादांच्या चिडण्यामागे लोकांची विधायक कामे पूर्ण होण्यासाठीची तळमळ असते, हे कार्यकर्त्यांना चांगलेच ठाऊक असायचे. अजितदादांनी जलसंपदा मंत्री या पदाची धुरा सांभाळताना, कार्यभार पाहताना महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीचा अत्यंत बारकाईने आणि गांभीर्याने अभ्यास केला होता. यातून भूगर्भातील पाण्याच्या पातळीत होणारी घट आणि त्यातच राहणारी पावसाची अनियमितता यासारखे अनेक प्रश्न समोर असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले होते. यावर तोडगा म्हणून धरण बांधकामाची सुरुवात, कॅनॉल, कालवे इत्यादी कामे त्यांनी प्राधान्याने पूर्णत्वाला नेली. याशिवाय 'पाणी साठवण योजने'सारख्या योजना राबवल्या. यामुळे पाण्याची अडचण दूर झाली. दादा जितके कठोर, तितकेच मिश्कील होते. फिरक्या घ्यायला ते कमी करत नसतं. गोदावरी खोऱ्याच्या पाण्यावरून नगर-नाशिक विरुद्ध मराठवाडा असा संघर्ष सुरू असताना नाशिक-नगरच्या नेत्यांना ते हसत सांगायचे, की मराठवाड्याला पाणी देऊ द्या. तिथे माझी सासुरवाडी आहे. घरच्यांचं मन जपायला तेवढं तरी करू द्या!

महाराष्ट्रातील विविध पाटबंधारे योजनांना गती देताना ठिबक आणि अनेक नव्या तंत्रज्ञानाच्या बीज प्रक्रियांचे निर्णय त्यांनी घेतले. खोरेनिहाय धरण, पाटबंधारे, पाणलोट यासंदर्भात सर्वांगीण विचार करताना दादांनी धडक कामे मार्गी लावली. अजितदादांच्या राजकारणाचा मोठा भाग हा लोकांच्या आयुष्याशी निगडित होता. तिथे इतर नेत्यांसारखा गरळ ओकण्याचा विषय नसतो. दादा नेहमीच महाराष्ट्राच्या उन्नतीसाठी रात्रंदिवस एक करत असत. सत्ता असो वा नसो; दादा अविरत काम करत असत, हे महाराष्ट्राला माहीतच आहे. दादा आणि बळीराजा यांच्यामध्ये एक वेगळ्या प्रकारचे नाते होते. महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीमध्ये बळीराजाला प्रचंड कष्ट सोसावे लागतात. बळीराजाची ही अवस्था पाहून दादा दुष्काळातील जनतेला दिलासा देण्यासाठी उन्हातान्हात फिरत. त्यातून दुष्काळग्रस्त शेतकरी, पिण्याच्या पाण्यासाठी दाही दिशा फिरणाऱ्या माता-भगिनी, पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे चिंतेत असणारे छोटे कारखानदार यांना दुष्काळाच्या दुष्टचक्रातून निश्चितच काहीसा आश्चर्यकारक दिलासा देणारा निर्णय दादा तळमळीतून घेत. महिला शिकून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाल्यास कुटुंबाला उभे करते. त्यामुळे महिला सबलीकरण हा विषय अजितदादांच्या अजेंड्यावर होता. महिलांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये ५० टक्के राखीव जागांचा निर्णय दादांच्या पुढाकारातून झाला. महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा खूप मोठा निर्णय होता.

बळीराजा, महिला, युवक, दलित, आदिवासी यांचा विकास हा दादांच्या राजकारणाचा गाभा होता. दादांनी या उपेक्षित वर्गासाठी घेतलेले निर्णय त्यांना या वर्गाचा तारणहार म्हणून सिद्ध करतात. दादा स्वतः शेतकरीपुत्र होते. त्यांना शेतकऱ्यांचे दुःख समजत होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत ते नेहमीच आक्रमक भूमिका घेताना दिसले. कर्जमाफी, नुकसानभरपाई, पीक विमा योजना अशा विषयांवर त्यांनी वेळोवेळी सरकारवर दबाव आणला. त्यामुळे ग्रामीण भागात त्यांची कायम लोकप्रियता राहिली. राजकारणात अनेकदा नेते संभ्रमात राहतात; मात्र अजित पवार यांनी नेहमीच स्पष्ट आणि ठाम भूमिका घेतली. नेतृत्व म्हणजे सर्वांनाच खूश करणे नसते, तर योग्य वाटणारा मार्ग निवडणे असते, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले होते. सरकारी फाईलींचा ढीग न करता निर्णय त्वरित घेणे, अधिकाऱ्यांकडून वेळेत काम करून घेणे हा त्यांचा स्वभाव होता.

काही वक्तव्ये, काही निर्णय आणि सत्तासंघर्ष यामुळे ते टीकेचे धनी झाले होते; मात्र त्यांनी कधीही टीकेमुळे काम थांबवले नाही. लोकशाहीमध्ये टीका अपरिहार्य असते. त्यातून शिकत पुढे जाणे, हीच परिपक्व नेतृत्वाची खूण असते. अजित पवार यांनी स्वतःला वेळोवेळी बदलत, सुधारत पुढे जाण्याचा प्रयत्न केला होता. मोठ्या पदावर असूनही त्यांनी जनतेशी असलेला संपर्क तुटू दिला नाही. त्यांच्या वाटचालीत चढ-उतार आले, वाद झाले, टीका झाली; पण काम करण्याची जिद्द मात्र कायम राहिली. आजच्या राजकारणात केवळ घोषणांची गर्दी दिसते. प्रत्यक्ष कृतीवर विश्वास ठेवणारे नेते दुर्मिळ होत चालले आहेत. त्यात अजित पवार होते. दुर्दैवाने आज ते आपल्यात नाहीत.

**(लेखक अजित पवार यांचे मामेभाऊ आहेत.)**

✦✦✦

# कधी थांबणार हे?

"

श्रमंती लाईव्ह स्टोरी



संदीप काळे
sandip98868@gmail.com
9890098868

सामाजिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारा माझा एक मित्र मराठवाड्यातील लातूर या जिल्हयात वरिष्ठ अधिकारी म्हणून रुजू झाला. तो मुंबईला असताना त्याची नेहमी भेट व्हायची. आता तो लातूरला गेल्यामुळे त्याची भेट दुर्लभ झाली आहे. म्हणून मी त्याला भेटण्यासाठी मुद्दाम लातूरला गेलो.

दुपारी डब्बा खात असताना तो एका व्यक्तीची ओळख करून देत मला म्हणाला, 'हे राजीव कुलकर्णी, अमेरिकेत होते. अमेरिकेत त्यांनी भाडेतत्त्वावर जमीन घेऊन खूप वर्ष कसली. आता कुलकर्णी काही कारणास्तव लातूरमध्ये वापस आले आहेत. माझे जवळचे मित्र आहेत'.

मी कुलकर्णी यांना नमस्कार केला. बराच वेळ गप्पा मारल्यावर कुलकर्णी वरिष्ठ अधिकारी असलेल्या माज्या मित्राला म्हणाले, 'मी खूप अडचणींत आहे. त्यातून मार्ग कसा काढावा यासाठी मी येथे आलो आहे'.

ते वरिष्ठ अधिकारी मित्र म्हणाले, 'बोला ना'. माझ्याकडे बघत ते मित्र दबक्या आवाजात म्हणाले, 'माझा मुलगा समर्थ आता आठवीला आहे. गेल्या दोन वर्षांपासून तो व्यसनाधीन झालाय. आम्ही अमेरिकेत खूप इलाज केले, पण उपयोग झाला नाही. म्हणून आम्ही अमेरिका सोडून पुन्हा गावी लातूरला स्थायिक होण्याचा निर्णय घेतला'.

माझे अधिकारी मित्र त्यांना म्हणाले, 'तो इतका व्यसनाच्या आहारी गेला, तेव्हा तुम्ही काय करत होतात? कुलकर्णी म्हणाले, 'मी माझ्या शेती उपक्रमात होतो. माझी बायको यमुना नोकरी करायची. तो नाना प्रकारचे व्यसन करायचा. आम्हाला कळू न देता गोळ्या खायचा'.

कुलकर्णी त्यांच्या मुलाच्या व्यसनाधीनतेचे किस्से सांगत होते आणि आम्ही अवाक होऊन ऐकत होतो. कुलकर्णी यांच्या आपबीतीने माझे हातपाय एकदम गळून गेले. आम्ही एकदम निःशब्द झालो. सर्व सांगून झाल्यावर कुलकर्णी यांनी खिशातला रुमाल काढून आसवांनी डबडबलेले डोळे पुसले.

माझ्याकडे बघत माझा तो अधिकरी मित्र म्हणाला, 'या स्वरूपाच्या तक्रारी माज्याकडे दररोजच्या आहेत. आईवडलांना मुलांकडे बघायलाही वेळ नाही. आणि सहज करता येतात म्हणून मुले व्यसनांचे अनेक प्रयोग करतात.

अधिकारी मित्राने बेल वाजवून शिपायाला बोलवले. ते त्या शिपायाला म्हणाले, 'जरा विजयकुमार यादव सर यांना फोन करून बोलावून घ्या'. शिपाई गेला. कुलकर्णी यांनी अमेरिकेसह भारतातही पालकांच्या लाडामुळे, दुर्लक्षामुळे लहान लहान मुले खूप मोठ्या प्रमाणावर व्यसनाधीन झाली आहेत.

अनेक मुले व्यसनाधीनतेच्या मार्गावर आहेत. नशील्या पदार्थांच्या सेवनाबरोबर मोबाईल, टीव्हीच्या अतिवापरामुळे अनेकांचा कसा सत्यानाश झाला. आज दहावीच्या आतमध्यली ३० टक्के मुले व्यसनाधीनतेच्या आहारी गेल्याचे कुलकर्णी आणि वरिष्ठ अधिकारी मित्राच्या बोलण्यातून समजले.

इतक्यात यादव सर आले. यादव सरांची ओळख करून देताना अधिकारी मित्राने सांगितले, 'हे यादव सर. यांनी आजवर तब्बल दोन पिढ्यांना व्यसनाच्या खाईत जाण्यापासून वाचवले आहे. मी अनेक वेळा त्यांच्या व्यसनमुक्ती सेंटरला जाऊन आलो.

मी अनेक माणसं त्यांच्याकडे पाठवली. यादव सरांनी अनेकांचे संसार वाचवण्याचे काम केले आहे. त्यांच्या कामाचं कौतुक करावं तेवढं कमीच आहे. वरिष्ठ अधिकारी मित्र आणि कुलकर्णी यांनी त्यांच्या मुलाची सर्व परिस्थिती यादव सरांना सांगितली.

यादव सर म्हणाले, 'लहान मुलांच्या व्यसनाचा प्रकार खूप वाढलाय. बरं, या मुलांचे काय करायचे हा प्रश्न आहे. मोठ्या माणसांप्रमाणे त्यांना कोणत्याही व्यसनमुक्ती केंद्रात ठेवता येत नाही. लहान मुलांसाठी खूप कडक कायदे आहेत. त्यामुळे या लहान मुलांचं काहीही करता येत नाही.

न्यायाधीश, जिल्हाधिकारी, समाज कल्याण अधिकारी, पोलीस अधिकारी या सगळ्यांनाच रोज त्यांच्याकडे येणाऱ्या लहान मुलांच्या व्यसनाधीनतेवर करायचे काय हा प्रश्न आहे. वरिष्ठ अधिकारी असलेले मित्र मला म्हणाले, 'संदीपराव, तुम्ही एकदा जाऊन यादव सर करत असलेलं काम पाहून या. तुमच्या लक्षात येईल, त्यांचं काम किती मोठे आहे!'

अधिकारी मित्र यादव सरांविषयी भरभरून बोलत होते. मलाही यादव सर यांचे काम जाणून घ्याण्याची उत्सुकता लागली होती. कुलकर्णी यांना यादव सरांनी त्यांच्या मुलाला व्यसनाधीनतेतून बाहेर कसे काढायचे, याबाबत योग्य तो सला दिला.

त्या मुलांचे समुदेशन कसे करायचे, कोणते औषध द्यायचे हे सांगितले. मुलाला वेळ देणे, मुलावर खूप प्रेम करणे, त्यांना समजून घेणे किती गरजेचे आहे, हे यादव सर यांनी समजावून सांगितले. तुम्हाला जर या मुलांना खरंच व्यसनांतून बाहेर काढायचे असेल तर, तुम्हाला वैयक्तिक त्यांना वेळ द्यावा लागेल. तरच ती बाहेर येतील, अन्यथा येणार नाहीत.

अधिकारी मित्र आणि कुलकर्णी हे दोघे बोलत बसले. मी उठलो आणि यादव सरांसोबत त्यांच्या आंबेजोगाई रोडवर असलेल्या व्यसनमुक्ती सेंटरमध्ये जाऊन पोहोचलो.

दारू, गांजा अशा अनेक व्यसनांच्या आहारी गेलेल्या शेकडो लोकांचा तिथे इलाज केले जात होते. लातूरमधलं हे व्यसनमुक्तीचं सेंटर कसं सुरू केलं? त्या एका सेंटरचे अनेक सेंटर कसे झाले? राज्यभरातले व्यसनमुक्तीचे यादव सरांचे काम भारतभर कसे पोहोचले? आणि आज एक दोन हजार नाही तर तब्बल साठ हजारांहून अधिक लोकांना व्यसनमुक्त कसे केले, याचा खूप मोठा इतिहास यादव सरांनी माझ्यासमोर ठेवला.

प्रचंड आत्मविश्वास, प्रत्येकाचे चांगले करायची भावना आणि माझा जन्म देण्यासाठीच झाला आहे, ही उदात्त भावना यातून यादव सरांचे काम कुठलीही प्रसिध्दी न करता देशाच्या कानाकोप?यांत पोहचले आहे.

डॉ. विजयकुमार यादव (9372346476) उच्चशिक्षित, मोठ्या घरात जन्मलेले, एका शिक्षकाचे सुपुत्र. तरुण वयामध्ये आजूबाजूला असलेली व्यसनाधीन मंडळी यामुळे व्यस्थित होऊन मी आयुष्यभर लोकांना व्यसनांतून बाहेर काढेन, या निर्धाराने पेटून उठलेले यादव सर यांनी १९९९ ला लातूरमध्ये जीवनरेखा प्रतिष्ठान नावाची एक संस्था सुरू केली.

या संस्थेच्या माध्यमातून जीवनरेखा व्यसनमुक्ती केंद्र, एकात्मिक व्यसनाधीनता पुनर्वसन केंद्र आणि व्यसनमुक्तीचे पुनर्वसन केंद्र असे दोन सेंटर लातूरमध्ये सुरू केले. पैसे मिळोत वा न मिळोत, व्यसनग्रस्त माणसाला व्यसनांच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी संपूर्ण आयुष्य पणाला लावले.

जसंजसं काम वाढत गेलं, तशी काही अंशी शासनाची मदतही मिळू लागली. पण शासनाच्या तुटपुंज्या मदतीवर काही भागेना. स्वतःच्या जवळचे जे काही होते ते सरांनी अनेक वेळा विकायला काढले, पण सेंटरच्या माध्यमातून चालत असलेले काम काही थांबू दिले नाही.

दारू, गांजा आणि वेगवेगळ्या रसायनांचे सेवन करून त्याच्या आहारी गेलेले, पेट्रोलचा वास घेणारे, व्हाइटनरपासून ते चपल पॉलिश करण्याच्या क्रीमला व्यसनाचे साधन बनवणारे असे अनेक महाभाग त्या व्यसनमुक्ती सेंटरमध्ये होते.

कोणी दारूच्या व्यसनापायी वडलांची होती नव्हती ती सगळी शेती विकली. कोणी दारूच्या व्यसनातून अनेक ठिकाणी चोरी केली. कुणाला दारूच्या व्यसनामुळे वेगवेगळे आजार झाले होते. गांजाच्या व्यसनामुळे अनेकांचे आयुष्य बरबाद झाले होते.

एक दोन नाही, हजार नाही, तर ६० हजार लोकांना व्यसनांच्या विळख्यातून यादव सर यांनी बाहेर काढले आहे. तिथं असणाऱ्या प्रत्येक माणसावर स्वतंत्र चारशे पानांचा ग्रंथ होऊ शकेल, इतकं व्यसनांमुळे त्यांचे आयुष्य खंगून गेले होते.

प्रत्येकाची करूण कहाणी ऐकून असं वाटत होतं की, या जगात प्रचंड आनंद आहे, पण तुम्हाला जर एखादं व्यसन जडलं तर ते व्यसन कॅन्सरपेक्षाही खतरनाक असतं, हे तिथल्या प्रत्येक माणसाच्या पाणावलेल्या डोळ्यांतील आसवांना पाहून जाणवत होते.

यादव सर त्यांच्या कामात व्यग्र झाले. एक केंद्रात असलेली एक व्यक्ती संपूर्ण ट्रीटमेंट घेऊन घरी निघाली होती. त्या व्यक्तीला निरोप देण्यासाठी सोबतचे अनेकजण गेटपर्यंत आले होते.

मी त्या माणसाला विचारले, 'काय झाले? तुम्ही कुठले? आता सुटले का व्यसन? तो माणूस मला म्हणाला, मी राजीव रस्तोगी. मी ट्रक डायव्हर होतो. मित्रांच्या संगतीने दारूच्या व्यसनात बुडालो. शेवटी ज्या मित्रांची दारू यादव सर यांच्या सेंटरमुळे सुटली, त्याच मित्रांनी मला पैसे गोळा करून इकडे पाठवले.

आज निर्व्यसनी बनून एक नवे आयुष्य मी सुरू केले आहे. कपाळावर टिळा आणि गळ्यात माळ हे सारे काही केंद्रात मिळणाऱ्या शिकवणीतून शक्य झाले. माणूस कितीही श्रीमंत किंवा कितीही गरीब असो, तो एकदा व्यसनाच्या आहारी गेला की त्याच्या जगण्याला काहीही अर्थ उरत नाही.

मला दोन मुली आहेत. त्या कधी मोठ्या झाल्या आणि कधी त्यांचे लग्न झाले, हे मला कळलेच नाही. दारूपायी आयुष्य कसे उध्वस्त झाले, हे समजलेच नाही, असे म्हणत राजीव रडत होते. बाकी सर्व जण त्यांची समजूत काढत होते.

राजीव गेले. त्यांना पाठवताना त्यांचे सर्व मित्र भावुक झाले होते. मी यादव सर यांच्याकडे निघालो. यादव सर यांच्याकडे असताना एक व्यक्ती तिथल्या सर्वांना घेऊन समुपदेशनाचे धडे देत होती. त्याचे समुपदेशन ऐकत राहावे असेच होते.

त्या सेंटरमध्ये औषधाशिवाय वाचन, चिंतन, मनन, कीर्तन, हे सारे काही होते. मी यादव सर यांच्याकडे गेलो. समुपदेशन करणारे सरही तिथे आले. त्या सरांची ओळख करून देताना यादव सर म्हणाले, 'हा माझा मुलगा कृष्णा यादव. सर्व कामं आता हाच पाहतो.

अजून एका मुलीला यादव सरांनी जवळ बोलावले. तिची ओळख करून देत ते म्हणाले, 'ही कान्होपात्रा नखाते. चंद्रपूरची आहे. पुण्याच्या दवाखान्यात अधिकारी आहे. आमच्याच नर्सिंग कॉलेजमध्ये शिकली आहे. नखाते यांच्यासारख्या १५० मुली दरवर्षी आमच्या कॉलेजमधून प्रशिक्षित होऊन पडतात. आम्ही जो सेवाभाव ठेवून काम उभे केले आहे, त्या कामाला ह्या सर्व मुली हातभार लावतात.

पाचवीच्या मुलांपासून ते ७५ वर्षांच्या व्यक्तीपर्यत सर्वांच्या व्यसनाचे प्रकार खूप वेगवेगळे आहेत. अतिशय चिंताग्रस्त चेहरा करून यादव सर म्हणाले, 'एपीजे अब्दुल कलाम यांनी देशाला महासत्तेच्या दिशेने जाण्याचा कानमंत्र दिला खरा, पण प्रचंड प्रगती आणि सहजतेने, निष्काळजीपणाने आम्ही खूप गतीने मनोरुगणतेच्या दिशेने वाटचाल करतोय. अनेक ठिकाणी हेच चित्र आहे'. यादव सर खूप तळमळीने बोलत होते आणि मी खूप हतबल होऊन ऐकत होतो.

यादव सरांचा निरोप घेऊन मी परतीच्या मागार्ला लागलो. यादव सर, त्यांचे वडील रघुनाथ यादव, सरांची आई भगीरथबाई आणि आता तिसरी पिढी, म्हणजे यादव सरांचा मुलगा कृष्णा यादव हे सर्व कुटुंबीय सुरू केलेले काम खूप नेटाने पुढे नेट आहेत. समाजात बदल घडवून आणण्यासाठी असे अनेक यादव परिवार आपल्या आसपास आहेत, ज्यांना तुमच्या आमच्या मदतीची गरज आहे, बरोबर ना?

-----------------

(लेखक महासागर मीडिया ग्रुपचे मुख्य समूह संपादक आहेत)

■ ■ ■

# गुणत्रयांचा पसारा, क्षेत्री नांदे सारा...

मानवी मनाची प्रवृत्ती अशी आहे की एखाद्या वस्तू किंवा पदार्थाकडे आपण एका ठराविक गुणाच्या दृष्टीने पाहतो. एखादी गोष्ट चांगली किंवा वाईट, उपयुक्त किंवा हानिकारक, कण किंवा तरंग-अशा सरळ विभागणीतून आपण वास्तविकतेचा अर्थ लावतो. मात्र विज्ञान आणि तत्त्वज्ञान हे स्पष्ट सांगतात की एका पदार्थात एकाच वेळी दोन विरोधाभासी गुण अस्तित्वात राहू शकतात. ही संकल्पना प्रथमदर्शनी विसंगत वाटली तरी निसगार्ची मूलभूत रचना ही विरोधाभासांवर उभी आहे.

क्वांटम भौतिकशास्त्रात याचे सर्वात ठळक उदाहरण म्हणजे तरंग-कण द्वैत. इलेक्ट्रॉन हा मूलभूत कण असून त्याला वस्तुमान असते आणि तो ठराविक जागी आढळतो; परंतु त्याचवेळी इलेक्ट्रॉन तरंगासारखे वर्तनही दाखवतो, हस्तक्षेप करतो आणि विवर्तनात सहभागी होतो. 1924 साली लुई डी ब्रॉग्ली यांनी सांगितले की प्रत्येक कणाला तरंगस्वरूप असते, आणि पुढील प्रयोगांनी हे सिद्ध झाले.

प्रकाशाचे उदाहरणही याच रेषेत येते. प्रकाश तरंगासारखा वागतो, कारण तो अपवर्तन, विवर्तन आणि हस्तक्षेप दाखवतो; परंतु फोटोइलेक्ट्रिक परिणामात तो कणासारखा वागतो. आल्बर्ट आइन्स्टाईन यांनी 1905 साली यावर प्रकाशाच्या कणस्वरूपाचे स्पष्टीकरण दिले आणि त्यासाठी नोबेल पारितोषिक मिळाले.

सदरील विरोधाभास केवळ सूक्ष्मपातळीपुरता मर्यादित नाही. पाणी, जीवनदायी असूनही पूर, बुडणे किंवा मृदाक्षयामुळे विनाशाचे कारण ठरू शकते. औषधे निश्चित प्रमाणात उपयुक्त असतात, पण जास्त घेतल्यास विषारी ठरतात. 16 व्या शतकातील तत्त्वज्ञ Paracelsus यांनी स्पष्ट केले होते, "The dose makes the poison." आग उष्णता, प्रकाश आणि अन्न शिजवण्यासाठी आवश्यक असते, पण अनियंत्रित झाल्यास विनाशक ठरते. या सर्व उदाहरणांत एका पदाथार्तून सृजन आणि संहार एकत्र दिसतो.

भारतीय तत्त्वज्ञान आणि विशेषतः संत ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीत (अध्याय १३ - क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ) या विरोधाभासी गुणांचा उल्लेख आढळतो. ज्ञानेश्वर सांगतात की एका देहात सुख-दुःख, बंध-मोक्ष, उष्ण-शीत, प्रकाश-अंधार असे विरोधी गुण एकत्र अस्तित्वात असतात, पण आत्मा (क्षेत्रज्ञ) यापासून स्वतंत्र राहतो. उदाहरणार्थ, दीप प्रकाश देतो, तरी अंधारही त्याच ठिकाणी दिसतो (ओवीः दीपु जळे प्रकाश देई, तरी अंधार नासे पाही). आग उष्णता व प्रकाश देते, पण विनाशही घडवते. औषध ठराविक प्रमाणात उपचारक ठरते, पण जास्त प्रमाणात विषारी ठरते. गुणत्रयांचा प्रसार प्रत्येक क्षेत्रात दिसतो, पण क्षेत्रज्ञ (आत्मा) त्यापासून स्वतंत्र राहतो (ओवीः गुणत्रयांचा पसारा, क्षेत्री नांदे सारा).

क्वांटम भौतिकशास्त्रातील सुपरपोजिशन ही संकल्पना या विरोधाभासाला अधिक खोलवर नेते. Schrödinger's Cat या विचारप्रयोगात कण निरीक्षण होईपर्यंत एकाचवेळी अनेक अवस्थांमध्ये असतो-तो आहेही आणि नाहीही-अशी अवस्था असते. तत्त्वज्ञानातही सत्‌असत्‌, प्रकृती-पुरुष, शिव-शक्ती यांसारख्या संकल्पनांमध्ये विरोधी घटकांचा समावेश दिसतो.

अखेरीस, असे म्हणता येईल की निसर्ग सरळ रेषीय नसून विरोधाभासांनी समृद्ध आहे. एका पदार्थात दोन विरोधी गुण असणे विसंगती नसून निसर्गाचा नियम आहे. विज्ञान हे विरोधाभास सूक्ष्म स्तरावर दाखवते, तर ज्ञानेश्वराचे तत्त्वज्ञान आपल्याला सांगते की या विरोधाभासांमध्ये आत्मा स्थिर आणि स्वतंत्र राहतो. या समजामुळे आपल्याला वास्तविकतेचा अधिक व्यापक, सहिष्णू आणि वैज्ञानिक दृष्टिकोन प्राप्त होतो.

■ **विजयकुमार राऊत.**

**आजच्या काळात सायबर सुरक्षा अधिक महत्त्वाची बनली आहे. प्रत्येक वापरकर्त्याने आपली वैयक्तिक माहिती जपून ठेवली पाहिजे आणि ऑनलाइन व्यवहार करताना अधिक सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. करभरणेची तारीख उलटल्यानंतर प्राप्तीकर खात्याचा परतावा लोकांच्या खात्यात जमा होत असतो. याचा फायदा घेऊन सायबर गुन्हेगार भाबड्या करदात्यांना लुबाडण्याचा प्रयत्न करतात. याबाबत सतर्क असायला हवे.**

# प्राप्तिकर परताव्यातून सायबर गुन्ह्याचे तंत्र

डॉ. दीपक शिकारपूर



प्राप्तिकर खात्याकडून येणारा परतावा म्हणजे आर्थिक वर्षात भरलेला कर प्रत्यक्ष देय असलेल्या करापेक्षा जास्त असतो, तेव्हा सरकार परत करते ती अतिरिक्त रक्कम. दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे तर, तुम्ही सरकारला गरजेपेक्षा जास्त कर दिल्यास परत मिळणारी जास्तीची रक्कम. चुकून देय करापेक्षा जास्त कर भरल्यास, टीडीएस कपात जास्त झाल्यास, कार्यालय किंवा बँकेने उत्पन्नावर (उदा. पगार, व्याजाचे उत्पन्न) जास्त टीडीएसकपात केल्यास असा परतावा मिळतो. करबचतीसाठी केलेल्या गुंतवणुकीची माहिती नंतर सादर केल्यास, कर गणनेमध्ये काही चूक झाल्यासही हे अनुभवायला मिळते. अशा वेळी मिळणारा परतावा बहुतेक वेळी थेट तुमच्या बँक खात्यात जमा केला जातो. अशा वेळी परतावा प्रक्रियेद्वारे प्राप्त होईल आणि लवकरच आपल्या खात्यात जमा होईल, अशी इमेल किंवा मेसेज येतो. याचा फायदा घेऊन सायबर गुन्हेगार भाबड्या करदात्यांना लुबाडण्याचा प्रयत्न करतात. यासाठी सतर्क असणे जरुरीचे आहे. हा एक प्रकारचा सायबर घोटाळा आहे, जिथे सायबर गुन्हेगार प्राप्तिकर विभागाचे अधिकारी असल्याचा बनाव करतात. कर परतावा मिळणार असल्यास किंवा करगणनेत काही चूक झाली असल्याच्या खोट्या गोष्टी सांगून ते करदात्यांची गोपनीय आर्थिक माहिती मिळवतात. या प्रकारांना आळा घालणे महत्वाचे ठरते.

सहसा करदात्याला ईमेल किंवा इन्स्टंट मेसेजिंग ॲप्लिकेशनवरून एक मेसेज येतो, ज्यामध्ये तुमचा प्राप्तिकर परतावा थकीत आहे किंवा तुम्ही भरलेली कराची रक्कम चुकीची आहे किंवा प्राप्तिकर भरताना काही तरी चूक झाली आहे, असे दावे केलेले असतात. अशा मेसेजचा उद्देश करदात्याला घाबरवून तातडीने काही तरी करण्याची भावना निर्माण करणे हा असतो. मेसेजमध्ये एक लिंक असते, जी प्राप्तिकर विभागाच्या अधिकृत ईफायलिंग पोर्टलसारखी दिसते. करदात्याला प्राप्तिकर विभागाचे अधिकृत ॲप असल्याचा बनाव करून संबंधित सायबर गुन्हेगार एक एपिके फाइल डाऊनलोड करायला सांगतात, ज्याचा उपयोग प्राप्तिकराशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी असल्याचे सांगितले जाते. एकदा करदात्याने त्या लिंकवर क्लिक केले किंवा बनावट ॲप इन्स्टॉल केले की ते एका बनावट वेबपेजवर किंवा इंटरफ`सवर जातात, जे सरकारी प्लॅटफॉर्मसारखे दिसते. इथे, त्यांना आपली बँक आणि आर्थिक माहिती तसेच वैयक्तिक माहिती भरण्यास सांगितले जाते. फसवणूक अधिक प्रभावी बनवण्यासाठी, घोटाळेबाज प्राप्तिकर विभागाचे अधिकारी किंवा हेल्पडेस्क प्रतिनिधी असल्याचे भासवून फोन करतात आणि करदात्याला बनावट ॲप इन्स्टॉल करण्यास किंवा लिंकवर क्लिक करण्यास आणि आवश्यक माहिती देण्यास सांगतात. एकदा आवश्यक माहिती मिळाली, की घोटाळेबाज त्याचा वापर अनधिकृत इलेक्ट्रॉनिक व्यवहार करण्यासाठी करतात. यामुळे करदात्याचे किंवा पीडिताचे आर्थिक नुकसान होते.

असे गुन्हे सातत्याने वाढत आहेत. त्यामुळे तज्ज्ञांकडून सातत्याने खबरदारीचे काही उपाय सांगितले जातात. पहिला म्हणजे सत्यता तपासणे. प्राप्तिकर विभागाकडून पाठवल्याचा दावा करणाऱ्या कोणत्याही ईमेलची सत्यता नेहमी तपासावी. अशा संपर्काचा स्रोत काय आहे, याकडे लक्ष द्यावे. शंका असल्यास अशा मेसेजला प्रतिसाद देणे टाळावे. अनोळखी लिंकवर क्लिक करू नये किंवा फाइल डाऊनलोड करू नये. ईमेल किंवा इन्स्टंट मेसेजिंग प्लॅटफॉर्मवर आलेल्या परतावा किंवा पेमेंटसंबंधित लिंकवर क्लिक करणे टाळावे. या लिंक बनावट वेबसाइट्सकडे घेऊन जाऊ शकतात किंवा फोनमध्ये मालवेअर डाऊनलोड करू शकतात. सामान्यजनांनी आपली संवेदनशील माहिती कधीही शेअर करू नये. पासवर्ड, कार्ड नंबर यासारखी संवेदनशील माहिती कोणाशीही शेअर करू नये. कोणताही अधिकृत सरकारी विभाग फोनकॉल, मेसेज किंवा ईमेलद्वारे ही माहिती कधीही मागत नाही. प्राप्तिकराची नोटीस किंवा परताव्याच्या अलर्टसंबंधी कोणताही मेसेज आल्यास थेट अधिकृत वेबसाइटवर जाऊन आपल्या खात्यात लॉग-इन करुन मेसेजची सत्यता तपासावी. फोनची ऑपरेटिंग सिस्टीम आणि ॲप्स नियमितपणे अपडेट ठेवावे, जेणेकरून सुरक्षाविषयक त्रुटी दूर होतील.




तसेच विश्वासार्ह अँटीव्हायरस किंवा मोबाईल सुरक्षा पचा वापर करावा, ज्यात रिअल-टाइम संरक्षणाची वैशिष्ट्ये असतील. असे घोटाळे, फसवणुकीचे प्रकार राष्ट्रीय सायबर गुन्हे हेल्पलाइन-वर कळवावेत. यासाठी १९३० या क्रमांकावर कॉल करावा किंवा विभागाच्या वेबसाइटवर तक्रार नोंदवावी.




सायबर गुन्हेगार आपले सावज कसे शोधतात हे इथे समजून घेणे महत्वाचे ठरते. सायबर गुन्हेगार आपल्या लक्ष्याचा शोध घेण्यासाठी अनेक पद्धती वापरतात. यामध्ये आता आर्टिफिशियल इंटेलिजन्सचाही वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. बरेचदा सोशल इंजिनिअरिंगच्या माध्यमातून लोकांना हेरले जाते. यामध्ये लोकांच्या मानसिकतेचा फायदा घेतला जातो. उदाहरणार्थ, आ-`ळखीचा बहाणा करणे. गुन्हेगार कुटुंबातील सदस्य किंवा मित्र असल्याचा दावा करतात आणि माहिती मिळवतात. बरेचदा ते तुमच्या मनात तातडीची गरज किंवा भीती निर्माण करतात, जसे की तुमचे बँक अकाउंट बंद होणार आहे किंवा तुमच्यावर कायदेशीर कारवाई होणार आहे, असे सांगून घाबरवले जाते, जेणेकरून तुम्ही घाबरून ते सांगतील ती कृती करता. बरेचदा सार्वजनिक माहिती आणि डेटा लीक केला जातो. आजकाल लोक सोशल मीडियावर खूप माहिती शेअर करतात. गुन्हेगार या माहितीचा वापर करतात. अनेकदा बँक खाते, आधार, पॅनची माहिती सोशल मीडियावर पाठवली जाते. हे नक्कीच धोकादायक आहे. काही प्रसंगी सोशल मीडिया अकाउंट्सवरून वाढदिवस, कामाची जागा, छंद किंवा कुटुंबाची माहिती मिळवली जाते. या माहितीचा वापर करून ते पासवर्डचा अंदाज लावण्याचा प्रयत्न करतात. अनेकदा कंपन्यांच्या डेटाबेसमध्ये सायबर हल्ला होतो. त्यावेळी ग्राहकांची वैयक्तिक माहिती, जसे की ईमेल आयडी आणि पासवर्ड लीक होते. ही माहिती गुन्हेगार डार्क वेबवर विकत घेतात आणि नंतर दुसऱ्या हल्ल्यासाठी त्याचा वापर करतात.

बरेचदा आपणच अशा गुन्हेगारांची शिकार होतो. काही व्यक्ती किंवा कंपन्यांची सायबर सुरक्षा कमकुवत असते. या व्यक्ती सर्वात सोप्या शिकार असतात. बरेचदा आपण ठेवलेले सोपे पासवर्ड फसवणुकीला कारण ठरतात. १२३४५६ किंवा यासारखे सोपे पासवर्ड वापरणाऱ्या लोकांना सहज लक्ष्य केले जाऊ शकते. जुन्या किंवा अपडेट न केलेल्या सॉफ्टवेअरमध्ये अनेक कमतरता असतात. त्याचाही फायदा गुन्हेगार घेतात. कृत्रिम बुध्दिमत्तेच्या मदतीनेही सायबर गुन्हेगार आपले हल्ले अधिक प्रभावी आणि वेगवान बनवतात. एआयचा वापर ते विविध प्रकारे करतात. फिशिंग हल्ले अधिक वैयक्तिक बनवणे, हा याचाच एक प्रकार. आधीचे फिशिंग ईमेल हे सहसा व्याकरण आणि स्पेलिंगच्या चुकांनी भरलेले असायचे. पण एआयच्या मदतीने आता असे ईमेल अत्यंत अचूक आणि तुमच्यासाठी खास तयार केल्यासारखे वाटतात. एआय यंत्रणा सोशल मीडियावरून माहिती गोळा करून, तुमच्या आवडींचा, सवयींचा अभ्यास करुन असे मेसेज तयार करू शकते. एआयचा वापर करून गुन्हेगार असे मालवेअर तयार करतात, जे आपोआप बदलतात. दुर्दैवाने पारंपारिक सुरक्षा सॉफ्टवेअर त्यांना पकडू शकत नाहीत. एआय टूल मोठ्या प्रमाणात इंटरनेटवरून डेटा गोळा करू शकतात. यामुळे कमी वेळात मोठ्या प्रमाणात लोकांची माहिती मिळवणे गुन्हेगारांसाठी सोपे झाले आहे. एआयच्या मदतीने आता ऑडिओ आणि व्हिडिओचा वापर करून एखाद्या व्यक्तीचा आवाज किंवा चेहरा हुबेहूब कॉपी करता येतो. याचा वापर करून ते फोन कॉल किंवा व्हिडिओ कॉलद्वारे लोकांना फसवतात.

या पार्श्वभूमीवर आता सायबर सुरक्षा अधिक महत्त्वाची बनली आहे. प्रत्येक वापरकर्त्याने आपली वैयक्तिक माहिती जपून ठेवली पाहिजे आणि ऑनलाइन व्यवहार करताना अधिक सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे.

deepak@deepakshikarpur.com
(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)


✦✦✦

**अलिकडच्या काळात भारत-पाकिस्तान आणि रशिया-युक्रेन संघर्षात जगातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला. भारताने थेट पाकिस्तानमध्ये घुसून विमानतळ, लष्करी तळ उद्ध्वस्त केले, तर युक्रेनने मॉस्कोत घुसून हल्ला केला. या हल्ल्यामुळे ड्रोनची उपयुक्तता सिद्ध झाली. इथून पुढे युध्दात ड्रोन आणि विमानांचे हल्ले रोखण्यावर भर असणार आहे. भारत त्यादृष्टीने तयारी करत अत्याधुनिक रडार यंत्रणा खरेदी करत आहे.**

# संरक्षणसिद्धतेच्या दिशेने...

मिशन २०४७
प्रा. मुक्ता पुरंदरे

पहलागममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय लष्कराने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये भारताने पाकिस्तानला धडा शिकवला असला, तरी या संघर्षाच्या काळात आपल्या कमकुवत बाजूही पुढे आल्या. लष्कराने प्रगत हवाई संरक्षण (एडी) रडारची खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. भारतीय लष्कराने उत्तर आणि पश्चिम सीमेतील हवाई संरक्षण नेटवर्कमधील अंतर दूर करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. लष्कराची ४५ 'लो-अल्टिट्यूड लाइटवेट रडार' (ॲडव्हान्स्ड), ४८ 'एअर डिफेन्स फायर कंट्रोल रडार-ड्रोन डिटेक्टर' (एडीएफसीआर-डीडी) आणि १० 'लो-अल्टिट्यूड लाइटवेट रडार' (ॲडव्हान्स्ड) खरेदी करण्याची योजना आहे. हे 'एडी' रडार लहान रडार क्रॉस-सेक्शन (आरसीएस) वापरून हवाई वस्तू शोधण्यास, ट्रॅक करण्यास आणि त्यांच्याशी संपर्क साधण्यास सक्षम आहेत. मे महिन्यात भारतीय हवाई क्षेत्रात घुसलेल्या पाकिस्तानी ड्रोनचा शोध घेण्यासाठी त्यांचा वापर करण्यात आला. रडार म्हणजे 'रेडिओ डिटेक्शन अँड रेंजिंग.' ही एक विशेष इलेक्ट्रॉनिक प्रणाली आहे. ती लक्ष्यित वस्तूंची दिशा, अंतर आणि वेग निश्चित करण्यासाठी रेडिओ लहरी वापरते. 'एडी' रडार सैन्याला हवाई धोके शोधण्यास, ओळखण्यास आणि नष्ट करण्यास मदत करतात.


लो-अल्टिट्यूड लाइटवेट रडार

सोप्या भाषेत सांगायचे तर रडारमध्ये दोन मुख्य घटक असतात. त्यातील ट्रान्समीटर रेडिओ सिग्नल पाठवतो. दुसरा घटक रिसीव्हर आहे. तो लक्ष्यातून परावर्तित सिग्नल प्राप्त करतो. लक्ष्याच्या स्थानाचे सलग क्षणी मोजमाप केल्याने त्याचा मार्ग मोजणे शक्य होते. १९३० आणि १९४० च्या दशकात प्रामुख्याने लष्करी वापरासाठी रडार विकसित करण्यात आले होते. युद्धात हवाई शक्तीच्या वाढत्या महत्वामुळे ती सैन्यासाठी एक आवश्यक बचावात्मक आणि नंतर आक्रमक प्रणाली बनले.

'एडी रडार'चे दोन मुख्य प्रकार आहेत. एक पाळत ठेवणारे रडार तर दुसरे अग्निनियंत्रण रडार. पाळत ठेवणारे रडार हवेत कोणत्या वस्तू फिरतात, यावर लक्ष ठेवतात. त्यात हेलिकॉप्टर, विमाने, ड्रोन आदींचा समावेश होतो. अग्नीनियंत्रण रडार पृष्ठभागावरून हवेत मारा करणाऱ्या तोफा किंवा क्षेपणास्त्रांना लक्ष्य करण्यास मदत करते. सध्या भारतीय लष्कर आणि भारतीय हवाई दल (आयएएफ) पाळत ठेवणारे आणि अग्नी नियंत्रण रडार अशा दोन्ही रडारांचा वापर करतात. भारतीय हवाई दल प्रामुख्याने उच्च आणि मध्यम-शक्तीचे रडार (एचपीआर आणि एमपीआर) वापरतात. ते शेकडो किलोमीटरच्या श्रेणीतील धोक्यांचा मागोवा घेण्यास सक्षम आहेत. ही रडार लढाऊ विमाने, शत्रूंची वाहतूक विमाने आणि वाक्ससारख्या मोठ्या लक्ष्यांविरुद्ध वापरली जातात. सैन्यदलाच्या दोन्ही विभागाकडे काही कमी-स्तरीय कमी वजनाचे रडार (एलएलएलआर) देखील आहेत. ती कमी उंचीवर उडणाऱ्या लहान हवाई वस्तू शोधतात. भारतीय हवाई दलाकडे 'थ्री डी सेंट्रल प्रिसिजन रडार' आणि अन्य रडार आहेत. सैन्य 'फ्लायकॅचर', स्वदेशी 'ॲडव्हान्स्ड सुपर फ्लेडरमॉस' (यूएसएफएम) रडार आणि 'एडी टॅक्टिकल कंट्रोल' रडार वापरते.

लष्कराची जुनी रडार अपग्रेड करण्याची गरज बऱ्याच काळापासून जाणवत आहे. मे महिन्यात पाकिस्तानशी झालेल्या तीन दिवसांच्या संघर्षादरम्यान ही गरज आणखी अधोरेखित झाली. 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान शत्रूवर पाळत ठेवण्यासाठी आणि ड्रोनवर प्रतिहल्ला करण्यासाठी कमी किमतीचे ड्रोन वापरले गेले. शत्रूचे ड्रोन भारतीय हवाई क्षेत्रात घुसले. नंतर ते पाडण्यात आले. ड्रोनसारख्या लहान आणि कमी अंतर उडणाऱ्या हवाई वस्तूंचा सामना करण्यासाठी 'एलएलएलडबल्यूआर' आणि 'एडीएफसीआर-डीडी' रडार खरेदी केले जात आहेत. असे ड्रोन जुन्या 'एडी' प्रणालींना अक्षम करू शकतात किंवा गोंधळात टाकू शकतात. 'आरसीएस' (रडार सिग्नेचर) रडारद्वारे एखादी वस्तू किती सहजपणे शोधता येते, हे समजते. आधुनिक स्टेल्थ तंत्रज्ञानाचा उद्देश विमानाचे 'आरसीएस' कमी करणे हा आहे. नवीन रडार केवळ धोके शोधण्यास आणि ट्रॅक करण्यास सक्षम नसतील, तर धोक्याच्या तीव्रतेनुसार त्यांना प्राधान्यदेखील देतील. भारताच्या 'एडी' पायाभूत सुविधांमध्ये विमानविरोधी तोफा, रशियन एस-४०० आणि स्वदेशी आकाश क्षेपणास्त्र प्रणालीचा समावेश आहे. या प्रणालीने 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान पाकिस्तानला भारताचे लक्षणीय नुकसान करण्यापासून रोखले.


एअर डिफेन्स फायर कंट्रोल रडार

लष्कराकडे आकाशतीर प्रणाली आहे. ती रडार आणि विमानविरोधी तोफांना एकात्मिक हवाई प्रतिमा प्रदान करते. भारतीय हवाई दलाकडे 'आयएसीसीएस' (इंटिग्रेटेड एअर कमांड अँड कंट्रोल सिस्टीम) यंत्रणा आहे. ती घुसखोरांना रोखण्यासाठी आणि नष्ट करण्यासाठी सर्व हवाई संरक्षण प्रणालींमधील डेटा एकत्रित करते. संरक्षण विभाग सध्या मिशन सुदर्शन चक्रअंतर्गत एक व्यापक हवाई संरक्षण ढाल तयार करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. या संदर्भात, 'डीआरडीओ'ने अलीकडेच एकात्मिक हवाई संरक्षण शस्त्र प्रणाली (आयएडीडबल्यूएस) ची पहिली यशस्वी चाचणी घेतली. ही प्रणाली सर्व उंचावरील भूभाग, मैदाने, वाळवंट आणि किनारी भागात तैनात केली जाईल. ड्रोनच्या वाढत्या प्रसाराविरुद्ध आपली क्षमता वाढवण्यासाठी आणि विद्यमान संरक्षणातील काही ऑपरेशनल अंतर भरून काढण्यासाठी भारतीय लष्कराने ३० 'पॅसिव्ह सर्व्हेलन्स सूट अँड डिटेक्शन सिस्टीम्स' (पीएसएसडीएस) ची मागणी केली आहे. मानवरहित हवाई प्रणाली (यूएएस) चा वेगाने होणारा प्रसार लष्करी आणि महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा क्षेत्रांसाठी हवाई धोका निर्माण करत आहे. हे धोके अनधिकृत देखरेख आणि गुप्त माहिती गोळा करण्यापासून पेलोड वितरण आणि कामिकाझे हल्ल्यांपर्यंत आहेत. सध्या 'आर्मी एअर डिफेन्स' (एएडी) कडे अशा 'यूएएस' शोधण्यासाठी आणि ट्रॅक करण्यासाठी फक्त सक्रिय सेन्सर आहेत. त्यांची शोध आणि ट्रॅकिंग श्रेणी मर्यादित आहे. अशा सेन्सरचा वापर शत्रूच्या इलेक्ट्रॉनिक युद्धप्रणालींच्या कामात व्यत्यय आणू शकतो.


एस-४००

शत्रूराष्ट्रावरील देखरेख आणि प्रतिहल्ल्यासाठी सक्रिय आणि निष्क्रिय अशी दोन्ही सेन्सर्स एकत्रितपणे वापरणे आज भारतासाठी आवश्यक आहे. अशा 'यूएएस'च्या निष्क्रिय सेन्सर्सचा अभाव प्रभावी कार्ये करण्यासाठी ऑपरेशनल क्षमतेवर परिणाम करत आहे. 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी विविध प्रकारच्या ड्रोनचा व्यापक वापर झाला. मागील संघर्षांच्या तुलनेत लष्करी कारवायांच्या स्वरूपामध्ये मोठा बदल झाला. प्रस्तावित 'पीएसएसडीएस'ला रेडिओ सिग्नल इंटरसेप्शनद्वारे शत्रुत्वाच्या 'यूएएस'ची दिशा शोधण्यासाठी, ओळखण्यासाठी आणि प्रदर्शित करण्यासाठी एक 'निष्क्रिय रेडिओ फ्रिक्वेन्सी आयडेंटिफिकेशन सिस्टीम' आणि 'थर्मल इमेजर', टीव्ही कॅमेरा आणि लेजर रेंजफाइंडर असलेली 'इलेक्ट्रो-ऑप्टिकल ट्रॅकिंग सिस्टीम' आवश्यक आहे. ही प्रणाली किमान ३.५ किलोमीटर अंतरावर ३० सेंटीमीटर व्यासाचे लहान ड्रोन शोधण्यास आणि सहा किलोमीटरपेक्षा जास्त अंतरावर १.६ मीटर आकाराचे लहान 'यूएएस' शोधण्यास, लॉक करण्यास आणि स्वयंचलितपणे ट्रॅक करण्यास सक्षम असावी, अशी अपेक्षा आहे. 'पीएसएसडीएस'ला लष्कराच्या आकाशतीर एअर डिफेन्स कमांड आणि रिपोर्टिंग नेटवर्कशीदेखील जोडले जाईल. त्यामुळे ते द्वि-मार्गी डेटा एक्सचेंज हवाई संरक्षण वातावरणाचा अविभाज्य भाग बनेल. ते उंचावरील प्रदेशांपासून मैदाने, वाळवंट आणि किनारी भागात सर्व भूप्रदेशांमध्ये तैनात केले जातील. रडार आणि जॅमरसारख्या 'पॅसिव्ह सिस्टीम्स' रेडिओ लहरींसारखे सिग्नल उत्सर्जित करत नाहीत. त्यामुळे शत्रूच्या हल्ल्यापासून या यंत्रणा सुरक्षित राहतात आणि पॅसिव्ह सिस्टीम्स शांतपणे माहिती गोळा करत असतात.

पाकिस्तानने सोडलेले तुर्कस्तानचे ड्रोन आणि चीनी क्षेपणास्त्रे भारताने रोखली होती. या ऑपरेशनने स्वदेशी प्रणालींची किती गरज आहे, हे दाखवून दिले. 'आयएडीडबल्यूएस' ही गरज पूर्ण करते. रशिया, चीन आणि इराणसारख्या देशांचे 'आयएडीडब्ल्यूएस' अमेरिकेच्या हवाई शक्तीचा मुकाबला करतात.


मानवरहित हवाई प्रणाली (यूएएस)

भारताची प्रणाली त्यांच्यासारखीच आहे; परंतु ती स्वदेशी आहे. ती भारताला हवाई धोक्यांविरुद्ध एक मजबूत ढाल प्रदान करते. ही बहुआयामी संरक्षण प्रणाली आहे. तिच्या चाचणीने सिद्ध केले आहे, की भारत स्वदेशी तंत्रज्ञानाद्वारे शत्रूचा मुकाबला करू शकतो. 'ऑपरेशन सिंदूर'मधून शिकत भारत आता भविष्यातील युद्धांसाठी तयारी करत आहे.

✦✦✦

# यूजीसीच्या नवीन नियमांवरून गदारोळ का?

नवीन यूजीसी नियमांवर इतका गदारोळ का झाला? प्रकरण न्यायालयापर्यंत का गेले आणि सर्वोच्च न्यायालयाला हस्तक्षेप का करावा लागला? खरे तर नवीन नियमांमुळे जातीआधारित टिप्पण्यांमध्ये समाविष्ट असलेल्या वर्गांची व्याप्ती वाढवली आहे. पूर्वी या कक्षेत केवळ अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचा समावेश होता. कारवाईतील कठोरताही कमी होती.

हेदेखील खरे आहे की, दलित वर्गावर वर्षानुवर्षे अन्याय होत आहे हे कुणीही स्वीकारू शकते आणि त्यांच्यावर झालेल्या अन्यायाची भरपाई करण्यासाठी या वर्गाचे उत्थान करणे योग्य ठरले असावे.

पण आता ओबीसी (इतर मागासवर्गीय) आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय (ईबीसी) वर्गदेखील या कक्षेत जोडले गेले आहेत. या कक्षेतून फक्त सामान्य किंवा अनारक्षित वर्ग वगळण्यात आला आहे.






नवीन नियमांमुळे सामान्य वर्गावर आपोआप आरोप होतील. दुसऱ्या शब्दांत, त्यांना डिफॉल्ट गुन्हेगार घोषित केले जाईल, असा विरोध करणाऱ्यांचा युक्तिवाद आहे.?

आश्चर्याची गोष्ट म्हणजे सामान्य वर्गासाठी कोणताही दिलासा नसला तरी असे म्हटले जात आहे की राखीव वर्गाने खोटी तक्रार दाखल केली तरी शिक्षेची तरतूद नाही. हे निषेधाचे एक प्रमुख कारण आहे.

असेही म्हटले जात आहे की सरकार मागासवर्गीयांची सहानुभूती मिळवण्यासाठी हे करत राहते. मोठ्या प्रमाणात निषेध झाल्यानंतर हे नवीन नियम मागे घेतले जातील किंवा योग्य सुधारणा केल्या जातील. परंतु नियम मागे घेतल्यानंतरही त्या वर्गाची सरकारबद्दल सहानुभूती कायम राहील! विरोधी वर्गाचा असा युक्तिवाद आहे की सरकार हे उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करीत आहे.

तसेही समग्रतेला नकार आणि फक्त तुकडे हेच वास्तविक आहे, असे दाखवण्याचे राजकारण स्वातंत्र्यापूर्वीही होते. आजही सुरू आहे. नेत्यांनी प्रथम लहान गटांना सतत अन्यायाला बळी पडलेल्यांना भडकावले, नंतर त्यांना पोकळ आश्वासनांची अफू दिली आणि शेवटी त्यांना अतिरेकीपणाच्या टप्प्यावर पोहोचू दिले.

नंतर या काही गटांच्या सर्व मागण्या पूर्ण झाल्या नाहीत. तेव्हा त्यांनी संपूर्ण शासनव्यवस्थेला आणि शेवटी संपूर्ण देशाला अन्याय्य म्हणण्यास सुरुवात केली होती. म्हणूनच तुकड्यांचे राजकारण उलटे झाले तेव्हा तेच राज्यकर्ते हेच तुकडे घेऊन विखुरलेल्या जातींना एकत्र करताना दिसून आले.

हे करताना ही मंडळी आम्ही समग्रतेला ओळख देणे आणि लहान वर्गांची एकजूट करत आहोत, असे सांगत होती. कारण असे करणे एकूण सामाजिक विकासासाठी अपरिहार्य आणि अनिवार्य बनले होते. स्वातंत्र्यापूर्व काळात ब्रिटिशांनी असेच केले होते. त्यांनी प्रथम समाजातील लहान वर्गांना स्वतंत्र ओळख देऊन फोडाफोडी केली.

वर्षानुवर्षे ते या युक्त्यांवर अवलंबून राहून राज्य करण्यात यशस्वी झाले. प्रत्यक्षात राजकारणाला आत्मा नसतो. राजकारणी लोकांकडे मते मागण्यासाठी जाणार नाही त्या दिवशी राजकारणाचा आत्मा जागृत होईल. हा आंतरिक आत्मविश्वास आणि बाह्य शक्तीमधील फरक आहे. भयमुक्त असणे आणि घाबरणे यात हाच फरक आहे.

राजकारणाला आत्मा नसतो. त्यामुळे त्यात आंतरिक शक्तीचाही अभाव असतो. ...आणि म्हणूनच काळाबरोबर प्रत्येक शक्ती स्वतःची जाणीव गमावते. आश्वासनांवर आधारित सिंहासन मिळवण्याची कल्पना तिच्या पायातील बेडी बनते.

आपल्या प्राचीन इतिहासात एक नाव आहे : मीरदाद. काही लोक त्यांच्याकडे हा प्रश्न घेऊन गेले. आपण इतके दुःखी का आहोत? मीरदाद म्हणाले, याचे उत्तर केवळ आपण श्वास घेत असलेल्या हवेतूनच मिळू शकते. ती हवा आपल्या स्वतःच्या विचारांच्या विषाने भरलेली आहे.

हे विष आपले घर-रस्त्यांवर आणि आपल्या दारांमध्ये कोरले गेले आहे. म्हणूनच आपण आता चेतनेचे किंवा महाचेतनेचे वारसदार नाही. ...आज आपण किंकाळ्या, जखमा आणि रस्त्यावर वाहणाऱ्या रक्ताचे वारसदार आहोत.

खरे तर सत्ता आणि सरकार, आसन आणि सिंहासनाचे लोकांना घाबरवण्याचे जणू कर्तव्य बनले आहे. ते केवळ शारीरिकदृष्ट्याच नव्हे तर मानसिकदृष्ट्याही गुलाम करतात. म्हणूनच... दररोज आपल्या पोटी आनंदाचा सूर्य जन्मतोआणि हाच सूर्य अनाथ होत असतो.

# झंझावात निमाला!



काही माणसांबद्दल आपल्याला कायम कुतूहल वाटतं, ते कुतूहल त्यांच्या दिसण्यामुळे, वावरण्यामुळे वागण्यामुळे, बोलण्यामुळे त्यांच्या संस्कारांमुळे, त्यांच्या जनसंपर्कामुळे कशामुळे ही असेल पण एक कुतूहल वाटतं असतं!

अजित पवार कायम कुतूहलाचा विषय होते! त्यांची प्रशासनावरची कमांड, त्यांचा जनसंपर्क, त्यांचा ह्या वयात असणारा फिटनेस, त्यांची वैयक्तिक आयुष्यातली, दैनंदिन दिनचर्येतील शिस्त, त्यांचा सेन्स ऑफ ह्युमर, त्यांचं 'नॉट रिचेबल असणं', त्यांची राजकीय धमक सगळं सगळंच कुतूहलाचा विषय! ते विरोधक होते तेंव्हाही, ते पुढे भाजपसोबत युतीत आलेत तेंव्हाही!

फार कमी लोकांकडे विषयाची क्लॅरिटी असते, अजित पवार 'प्रचंड क्लॅरिटी' असणारे व्यक्ती होते. राजकारणात केली जाणारी तडजोड, त्यासाठी अगदी ज्यांना राजकीय आयुष्याच्या पूर्वार्धात असंख्य शिव्या दिल्या त्यांच्या मांडीला मांडी लावून सत्तेत सहभागी होणं असेल तरीही सत्ता मिळाल्यावर काय काय लोकोपयोगी कामं करायची आहेत ह्याविषयी ते फार क्लियर होते!

उगा आपलं नाही... काय... राजकीय जीवनात, सामाजिक जीवनात तडजोड ही करावीच लागते, काय करणार, पण आम्ही सत्तेत फक्त लोकांच्या भल्यासाठी / कुणाला धडा शिकवायला आलोय... ही असली 'शुगर कोटेड' फालतु बडबड त्यांनी कधीच केली नाही!

उलट बॉस सत्तेशिवाय लोकांची कामं होत नाहीत, सत्ता हवीच, कुणाला काहीही वाटो, मी माझ्या लोकांच्या तोंडाला काय पानं पुसायची होय... हे असले थेट आणि स्पष्ट विचार ते कुणाचीही भीड भाड न बाळगता त्यांनी मांडलेत!

सभेत कार्यकर्त्यांना ते चुकले म्हणून दमदाटी करणं, तोंडावर ताबा ठेवायचा सल्ला देणं, सरकारी अधिकाऱ्यांची भर सभेत बिन पाण्याने करणं, सभेत 'दादा आय लव्ह यु' म्हणणाऱ्या कार्यकर्त्याला हसत 'आय लव्ह यु टु बरं का' म्हणणं, वरून 'अरे बायकोला जाऊन लव्ह यु म्हणं, ती म्हणंल गडी कसा काय बिघडला' असा टोमणा मारणं, हातावर मुका घेणाऱ्या कार्यकर्त्याला 'च्यायला बायकोने एवढं प्रेमानं किस केलं नसेल आम्हाला जितकं तू करतोय लेगा' म्हणून कोपरखळी मारणं, पत्रकारांच्या अतरंगी प्रश्नांना तितकीच अतरंगी उत्तरं दिल्यावर 'अरे बाबा मी काय तुला म्हातारा बितारा वाटलो का?' असा खोचक टोला लगावणं, ते बोलत असतांना मध्येच 'ओ दादा ओ दादा' म्हणणाऱ्या कार्यकर्त्याला 'गप रे दादा पादा बस तु खाली' म्हणणं, ऐन पत्रकारपरिषदेत एकनाथ शिंदेंना 'मनातून काही (मुख्यमंत्री न बनणं) जात नाहीय' आणि वरून 'शिंदेंचं माहिती नाही पण मी मात्र उपमुख्यमंत्री होणार आहे' म्हणत हळूच चिमटा काढणं ही फक्त दिलदार माणसंच करू शकतात!

आणि गंमत म्हणजे त्यांचे कार्यकर्ते, समर्थक, सहयोगी, पत्रकार, विरोधक कुणालाही त्यांनी मारलेल्या कोपरखळ्या बोचायच्या नाहीत! आणखीन एक गंम्मत सांगु वरचे त्यांचे लिहिलेले सगळे डायलॉग आत्ता तुम्ही त्यांच्याच टोनमध्ये मनांत वाचलेत, खरं सांगा हो ना? दॅट्स अजित पवार फॉर यु! अजित पवारांची सगळ्यात मोठी खासियत ही होती की त्यांनी शरद पवारांचे जे चांगले गुण होते ते सगळे घेतले, आणि जे 'त्याज्य' गुण होते ते अजिबात घेतले नाहीत!

अजित पवार धक्कातंत्राचे प्रणेते होते. पहाटेचा शपथविधी असो, पक्ष फोडून 'नॉट रिचेबल' होणे असो वा आयुष्याच्या पीच वरून कायमचं 'नॉट रिचेबल' होणं असो त्यांनी धक्कातंत्र शेवटपर्यंत कधीच सोडलं नाही! जाताजाता ही ते धक्का नाही तर संबंध महाराष्ट्राला 'शॉक' देऊन गेलेत! समर्थक असो वा विरोधक त्यांच्या अकाली निधनाच्या वृत्ताने संपूर्ण महाराष्ट्र शॉक झाला!



देवेंद्र फडणवीस ह्यांचे खूप जवळचे मित्र त्यांना सोडून गेले! राजकीय आणि वैयक्तिकदृष्ट्या देवेन दां साठी हा खूप मोठा लॉस आहे! सुनेत्रा पवारांशी झालेल्या भेटीत देवेंद्र ह्यांची देहबोली सगळंच सांगत होती, वाकलेले खांदे, शून्यात नजर, ही लॉस्ट अ मेजर सपोर्ट सिस्टम अँड हिस बर्थडे पार्टनर टु!

देवेंद्र आणि अजित दादा ह्यांचे वाढदिवस एकाच दिवशी २२ जुलै! हा दिवस देवेंद्र ह्यांना ह्यापुढे आयुष्यभर हॉट करत राहील! कॅलिबर आणि क्षमता असूनही कायम उपमुख्यमंत्री पदावर समाधान मानावं लागणं हा अजित पवारांना मिळालेला सगळ्यात मोठा शाप होता! एकप्रकारे ते 'शापित उपमुख्यमंत्री' होते!

देवेंद्र आणि अजित पवार दोघेही प्रशासकीय पकडीत मातब्बर, कामाचा प्रचंड व्याप सांभाळणारे आणि तो चांगल्याप्रकारे पेलू शकणारे नेते. अजित पवारांच्या जाण्याने प्रशासनावर मांड ठोकणारा मजबूत नेता राज्याने गमावला हे महाराष्ट्राचं दुर्दैव म्हणावं लागेल!

का कोण जाणे शरद पवारांकडे बघून आज भरून आलं! आज त्यांची थकलेली, खचलेली बॉडी लँग्वेज बरीच बोलकी होती! अजित पवार आता राजकीयदृष्ट्या त्यांचे विरोधक असले तरीही होते त्यांचे पुतणेचं ना! रक्ताचं नातं आणि गुरु शिष्याचंही! शरद पवारांनी सगळं बघून झालंय, चांगलं आणि अत्यंत वाईटही! ओळखू ही न येऊ शकणाऱ्या आपल्या पुतण्याच्या देहाकडे बघुन काय वाटलं असेल त्यांना? काय वाटलं असेल अजित पवारांच्या काकुंना? आणि सगळ्यात महत्वाचं अजित पवारांच्या वृद्ध मातोश्रींना?

ज्यांना अंगाखांद्यावर खेळवलं त्या आपल्या मुलाबाळांना असं वाईटरित्या जातांना बघणं कुठल्याही वृद्ध व्यक्तीसाठी क्रूर शिक्षाच आहे! राजकीय विरोध एका बाजुला पण शरद पवारांना मीडियासमोर येऊन थरथरणाऱ्या आवाजात स्पष्टीकरण देतांना बघून आज पहिल्यांदा त्यांच्याविषयी वाईट वाटलं!

राजकीय सारीपाट हा 'बुद्धिबळासारखा' असतो! तुमच्याकडे वजीर, घोडा, हत्ती, उंट सगळी फौज असो, अगदी शेवटच्या घरात पोहचून वजीर बनलेला प्यादा असो, राजा पटावर नसला तर खेळ तिथेच थांबतो, राजाला ग्रहण (चेक) लागलं तर अगदी वजिराचा बळी देऊनही राजाला वाचवायचं असतं, मग भलेही राजा एकच घर चालणार का असेना!

राजकारण असो वा बुद्धिबळ राजाचं अनन्यसाधारण महत्व असतं कारण त्याच्या हातात 'सत्ता केंद्र' असतं! सेनापती/वजीर बनवता येऊ शकतो, राजाला 'घडवावं' लागतं, घाव सोसून घडवावं लागतं! अजित पवार 'पवार राजकारणाचे' 'राजा' होते! काही लोकांना हे म्हणणं अतिशयोक्तीचं वाटेल, पण अजित पवार गेल्यावर नेमकी कुठे पोकळी निर्माण झालीय हे कळायला बराच वेळ लागेल.

प. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील साखर पट्टा, सहकार क्षेत्र, कृषी आणि शिक्षण क्षेत्रं ही 'कोअर पवार' राजकारणाची केंद्रबिंदू आणि त्यावर उभी असलेली राजकीय इको सिस्टम ही त्याच्या 'राजा'च्या अकाली एक्सिटने खऱ्या अर्थाने पोरकी झालीय! महाराष्ट्राचं, त्यातही प. महाराष्ट्राचं राजकारण ह्या एका घटनेमुळे अशक्यरित्या बदललं आहे, त्याची गणितंही बदलली आहे! आणि त्याचा परिणाम येणाऱ्या काळात दिसेल! एन अनसर्टन्टी नॉकिंग द स्टेट्स डोअर इन अ बिग वे!

अजित पवार दिलदार माणूस होता! कुणालाही कसलंच क्लॅरिफिकेशन न देणारा 'रांगडा', नोकरशाहीचे लगाम हातात ठेवून प्रशासनावर मांड ठोकून बसलेला 'कमांडर', वेळ पडल्यावर स्वतःच्या राजकीय गुरु आणि सख्ख्या काकांना वय झालंय तुमचं, तुम्ही सगळं काही मिळवून झालंय, आता थांबणार नसाल तर आम्हाला कधी चान्स मिळणार? ते थेट स्पष्टपणे विचारू शकणारा असा 'नो नॉनसेन्स' माणुस महाराष्ट्रात दुसरा झालाच नाही, होणारही नाही.

कारण राजकारणात 'साहेब' खूप झाले, होतीलही, पण आपलेपणाने कान ओढून शिस्त लावणारा 'दादा' एकच होता आणि राहील, अजित अनंतराव पवार! मोठ्या राजकीय आणि सामाजिक नेत्यांच्या अकाली मृत्यूची दुर्दैवी परंपरा महाराष्ट्राला लाभलीय, त्यात अजित पवारांचं नाव जोडलं जाणं खरंच दुर्दैवी आहे!

# अर्थार्थ



**डॉ. अविनाश प. परांजपे**
**वानाडोंगरी, हिंगणारोड, नागपूर.**

अर्थ याच्या बद्दल बरेच वाद, विसंवाद, प्रतिवाद आपण नेहमीच ऐकतो. पण एक जनसामान्य मराठी माणूस या बद्दल किती टक्के जागृत आहे? याचे उत्तर टक्केवारीत पाहता, ते काही दोन अंकी आकड्यात येतांना दिसत नाही. कारण यातील फक्त स्वतःबद्दल असल्याशिवाय कोणत्याही अर्थाशी सामान्य मराठी माणसाचा साधा परिचय देखील असेल असे व्यवहारात दिसून येत नाही. सर्व सामाजिक समज ही अर्थ म्हणजे एखाद्या शब्दाचा किंवा विधानाचा साधा, भाव, तात्पर्य, मतलब असा घेत असतो. पण याचेच विविध प्रकार असतात किंवा असू शकतात हेच जनसामान्यांना कधीही संगितले जात नाही.

--------------

आमच्या आजकालच्या तथा कथित हाय एज्युकेशन समजल्या जाणाऱ्या इंग्लिश माध्यमातील सीबीएसई वगैरे शाळांत हे काहीही शिकवले जात नाही. मग आमच्या भावी पिढीला हे कसे आणि कधी समजेल? याच विचाराने हा पंक्ति प्रपंच करीत आहे.

सगळ्यात आधी आपण बघूयात की जवळ जवळ समस्त माध्यमे ही, अर्थसंकल्प, अर्थपूर्ण वाटाघाटी किंवा संबंध.. असले मथळे देऊन बरेच लेखन करतात. यामुळे लोकांना समजलेला अर्थ याचा अर्थ पैसा हे जगजाहीर आहे. यातून अतिसामान्य अशिक्षित किंवा अर्धशिक्षित समाजाला हे सारे पैश्याच्या संबंधी आहे हे नक्की समजते.

पण जेव्हा कोणीही राजकारणी नेता काहीही वक्तव्य करतो आणि नंतर पलटी मारून शाब्दिक च्छल करून माझ्या म्हणण्याचा हा अर्थ नव्हता वगैरे म्हणून स्वतःची सुटका करून घेतो तेव्हा त्या सन्माननीय न्यायालयात इंग्लिश भाषेत त्या नेत्याच्या विरुद्ध केस चालविणारे तज्ञ मंडळी हे माझ्या मराठीचा बोल कावतुके, अमृताते पइजा जिंके! असे पटवून देऊ शकणे अवघड असते. कारण आंग्ल भाषा आमच्या मराठीच्या पत्रासही लागू शकत नाही. म्हणूनच आज माझा उद्देश आमच्या मराठी बांधवांना या अर्थाचे प्रकार व त्यांचे सर्वार्थ सांगणे हा प्रयत्न आहे.

आपण आता क्रमवारी लाऊन एकेका अर्थाच्या स्वरूपाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न करुया.

**१. मतीतार्थ :** म्हणजे आपल्या मती उर्फ बुद्धीस जो अर्थ समजणे अपेक्षित आहे तो अर्थ. आपण लहानपणी ससा व कासव यांच्या शर्यतीची गोष्ट ऐकलेली असते. या गोष्टीच्या पासून आपण जो बोध घेणे अपेक्षित आहे तो असा की मनुष्याने आपल्या अंगतील असलेल्या क्षमतेचा गर्व बाळगून दुसऱ्यास तकलादू समजून बेफिकीर राहिल्यास, जसा ससा मध्येच झोपून राहिला तसे, तर आपणास पराभवास सामोरे जावे लागते . हा बोध म्हणजेच या गोष्टीचा मतीतार्थ होय.

**२. भावार्थ :** ह्याचा उपयोग आपणास बहुतांशी पौराणिक व लोककथांच्या मध्ये केलेला आढळतो. यात उल्लेखलेले चमत्कार हे खरे खरे तसेच घडलेलेच असले पाहिजे असे नाही. तर जनमानसावर एखाद्या भावनेचा ठसा उमटावा असे वाटत असल्यास असल्या कथांचा उपयोग करण्यात येतो. जसे की महान संत शिरोमणि तुकाराम महाराजांच्या गाथा तीन दिवसांनी गंगेने न बुडविता परत केल्या. यात गंगा याचा अर्थ नदी नसून जनगंगा म्हणजेच जनतेने हृदयात जपलेल्या गाथांचे पाठ असलेले अभंग पुनः विदित करून पुनर्गठीत केले. पण गंगेने न बुडविता परत केल्या या वाक्याचा आपण भावार्थ जाणून घेतला पाहिजे, शब्दार्थ नाही.

**३. शब्दार्थ :** शब्दार्थ हा केवळ अक्षर समूहात दडलेला भाषारचनेचा अर्थ असतो ज्याचे एका पेक्षा जास्त अर्थ ही निघू शकतात. उदाहरण बघूयात, जसे की पाणी याचा सामान्य पणे घेतला जाणारा अर्थ म्हणजे जल. दूसरा अर्थ म्हणजे हात. जसे पाणिग्रहण, म्हणजे वराने वधूचा हात ग्रहण केला उर्फ स्वीकारला. त्या वरूनच तुमच्या कन्येचा हात मागायला आलो असा वाक्प्रयोग तयार झाला. तिसरा अर्थ म्हणजे क्षमता, दम ! या माणसात काही पाणी दिसत नाही हा वाक्प्रचार.

**४. व्यंग्यार्थ :** एखाद्याला टोमणा मारण्यासाठी मुद्दाम उलटे बोलणे, लिहिणे केले असल्यास त्यातून अपेक्षित काढावा असा अर्थ. आपण टोमणा मारण्यासाठी एखाद्याला हो हो तूच मोठा हुशार आहेस असे बोललो किंवा एखाद्या लुकड्या माणसं बद्दल हं माहिती आहे तो पैलवान असे संबोधतो, तेव्हा ऐकणाऱ्या माणसाने नेमका उलट अर्थ घ्यावा अशी आपली अपेक्षा असते त्या वेळेस हुशार किंवा पैलवान शब्दांनी मिळणारा बोध म्हणजेच व्यंग्यार्थ होय.

**५. ध्वन्यर्थ :** वाक्याचा अर्थ बोलतांना केलेल्या शब्दांवर घेतला जात नसून बोलतांना केलेक्या ध्वनि मधून निघतो. जसे एखाद्याचे स्वागत करतांना या म्हणतो तेव्हा आवाजात असलेली सात्विकता स्वागत दर्शविते. पण एखाद्याला कोणी रागाने या आता ! असे म्हटले तर त्याचा अर्थ आता चालतेव्हा असा होतो. हो हो तुमचेच बरोबर आहे असे वादात वेगळ्या स्वरात बोलले म्हणजे तुमचे चूक आहे असा होतो हे त्या वेळेच्या ध्वनीवर अवलंबून असते.

**६. काव्यर्थ :** काव्यात जर एखाद्या तरुणीच्या सौंदर्याचे वर्णन हरिणी सारखे डोळे, चाफ्याच्या फुला सारखे नाक, नागिणी सारखी वेणी असे असले म्हणजे ते शब्दशः घ्यायचे नसते. कायवतील शब्दांचा खरा अर्थ टपोरे काळे डोळे, रेखीव सरल नाक लाम्ब सडक वेणी असे घ्यायचे असते.

**७. वाच्यार्थ :** वाचे द्वारा म्हणजे बोलण्यातील शब्दांना अभिप्रेत असलेला अर्थ. त्या शब्दांना तसे च्या तसे समजायचे नसते. जसे ह्यांचे हृदय समुद्रा एव्हडे मोठे आहे. अमुक अमुक यांचे कडे कुबेराचा खजिना आहे. पण ते शब्दशःघ्यायचे नसून त्याचा अर्थ हे खूपच दयाळू आहेत व ते खूप श्रीमंत आहेत एव्हढाच असतो.

**८. गर्भितार्थ :** या प्रकारचा अर्थ त्या वाक्याच्या गर्भात दडलेले अर्थ असा असून आपण बोलतो एक पण ज्याला समजणे अपेक्षित आहे फक्त त्यालाच तो समजतो इतरांना सर्व साधारण अर्थ कळतो.

सामान्यतः असले संवाद आपले गुप्त कार्य करणारे विभाग असले संवाद कौशल्या दाखवतात. उदाहरणार्थ, भारताने जेव्हा पहिलं अणुपरीक्षण यशवी केले तेव्हा परकीय लोकांच्या समोर आपल्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांना सांगण्यात आले की मॅडम, बुद्ध हसला ! त्यांना त्याचा गर्भित अर्थ समजला. असल्याला इंग्रजीत कोड वर्ड म्हणतात.

**९. लक्ष्यार्थ :** यालाच हिंदीत काहींपे निगाहे काहींपे निशाणा म्हणतात. ज्याचा अर्थ आपले जे लक्ष आहे त्यालाच समजते. असली भाषा प्रेमीजनांना चांगलीच जमते.

मुलगा / मुलगी आपल्या अंगणातून ओरडून मी निघालो कॉलेजला असे आपल्या आईला सांगतो तेव्हा शेजारील प्रियेला तू लवकर ये मी पोहोचतोच आहे असला संदेश देतो.

**१०. अनेकार्थ :** एकाच शब्दाचे जेव्हा अनेक अर्थ निघू शकतात, तेव्हा त्या शब्दाचा अर्थ संदर्भावर अवलंबून राहतो. उदाहरण. झाडाचे पान हिरवे असते, पुस्तकाचे पान नंबर ११ वर असे लिहिले आहे. जेवायचे पान वाढून तयार आहे. मला बनारसी पान आवडते. वगैरे वगैरे.

**११. प्रतिकार्थ :** एखादे म्हणणे ठासून सांगतांना वापरलेले प्रतीक सांगते. जास्त शब्द वापर करण्याची गरज नसते. जसे पहाडी छाती, लोखंडी हृदय , दगडी मन, सशाची हिम्मत असे.

**१२. समानार्थ :** दोन शब्दांचा एकाच अर्थ असल्यास त्याला समानार्थ म्हणतात, जसे गोड आणि मधुर.

**१३. विरुद्धार्थ :** दोन शब्दांचे अर्थ एकमेकांच्या एकदम विपरीत असतात त्याल विरुद्धार्थ म्हंटले जाते. जसे जाड आणि बारीक .

**१४. परमार्थ :** ज्या लिखाणाने, काव्याने, वक्तव्याने, शाब्दिक अथार्ला अजिबात महत्व न देता सगळ्याचा अर्थ ईश्वराच्या स्तुति , आत्मा परमात्मा वगैरे दिशेकडे असून त्याचा अन्य अर्थ काढणे गैर असते त्यास परमार्थ म्हणतात.

**१५. स्वार्थ :** ज्या लिखाणाने, काव्याने, वक्तव्याने, शाब्दिक अथार्ने जर केवळ ते लिखाण, काव्य, वक्तव्य करणाऱ्याचे वैयक्तिक लाभ मिळाळणे हा उद्देश लक्षात येत असेल त्यास स्वार्थ म्हणतात.

**१६. अनर्थ :** ज्या लिखाणाने, काव्याने, वक्तव्याने, शाब्दिक अथार्ने जर केवळ ते लिखाण, त्या कर्त्याच्या इच्छित अर्थाच्या विरुद्ध शाब्दिक कीस पाडून बावाल निर्माण करण्यात येत असेल तर त्याला अनर्थ म्हणतात.

आता सामान्य माणसाने कोणत्याही नेत्याने, लेखकाने, कवीने केलेल्या लिखाणाने, काव्याने, वक्तव्याने, शाब्दिक अर्थाने लगेच व्यथित, उत्तेजित न होता सर्वार्थाने त्याचे विश्लेषण करून मगच प्रतिक्रिया देण्याचे ठरवावे हीच प्रार्थना !

## सुगंध

सुगंध केवळ फुलांनाच असावा असा नियम नाही
सुगंध आपल्या वागण्यात आणि बोलण्यात असावा

देहापेक्षाही मनाच्या निर्मळ गाभाऱ्यात
माणुसकीचा एक सुवास अखंड वसलेला असावा

नम्रता असावी शब्दात जसा फुलाचा गंध
ज्यामुळे जुळती रेशमी आणि अतूट अनुबंध

शब्दांच्या याच माधुर्याने दूरची माणसं जवळ येतात
आणि माणसाचे संस्कार उलगडत जातात

नसावा गर्व रंगाचा नसावा तोरा रूपाचा
असावा दरवळ सदा आपल्या साध्या आचरणाचा

जिथे शब्दांना लाभतो अत्तराचा मृदू स्पर्श
तिथेच फुलतो जीवनाचा खरा आणि चिरंतन हर्ष

**संज्योती चंदन, हनुमान नगर, अग्रवाल लेआउट, अकोला.**

# अस्मितेच्या राजकारणापेक्षा विकासाचा रोडमॅप प्रभावी

> मतदारांनी आक्रमक मराठी अस्मितेच्या राजकारणाला नकार दिला. बिगर-मराठी मतदारांनी भाजप-शिंदे युतीला पसंती दिली. कारण त्यांनी मराठी माणूस, उत्तर भारतीय आणि इतर समुदायांमध्ये यशस्वीरीत्या संतुलन साधले.

मुंबई मनपा निवडणुकीचे निकाल भारतीय राजकारणात भाजपचे वाढते वर्चस्व दर्शवतात. पंचायतीपासून संसदेपर्यंत प्रत्येक निवडणूक जिंकणे हे पक्षाचे ध्येय असले पाहिजे या पंतप्रधान मोदींच्या विधानाची पूर्तता करण्याच्या दिशेने भाजप हळूहळू वाटचाल करत आहे.

भाजप सर्व राज्यांत सत्तेत नाही. अनेक राज्यांच्या नागरी निवडणुका पक्षाने जिंकल्या नसल्या तरी सध्या २० राज्यांत त्यांच्याकडे एकट्याने किंवा युतीत सत्ता आहे. इतर पक्ष किंवा आघाड्या महाराष्ट्रात स्थानिक संस्थांच्या निवडणुका विजय मिळवू शकल्या नाहीत, परंतु २९ मनपा निवडणुकांमध्ये भाजपचे यश केंद्र व राज्य पातळीवर त्यांच्या सत्तेच्या वाट्यासारखे होते.

बीएमसी निवडणुका अनेक कारणांमुळे महत्त्वपूर्ण होत्या. प्रथम, मुंबई देशातील सर्वात गुंतागुंतीच्या शहरी राजकारणाचे रणांगण बनले. अभूतपूर्व युती तयार झाल्या. शिवसेना (यूबीटी) आणि मनसेची युती ठाकरे बंधूंना पुन्हा एकत्र आणली. परिणामी, काँग्रेसने महाराष्ट्र विकास आघाडीपासून वेगळे होऊन वंचित बहुजन आघाडीशी युती केली.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) महायुतीतून बाहेर पडली आणि एकट्याने निवडणुका लढवल्या. भाजप आणि शिवसेना (शिंदे) यांनी त्यांची युती कायम ठेवली, तरीही संघटनात्मक वर्चस्वावरून त्यांच्यात राजकीय संघर्ष निर्माण झाला. या नवीन समीकरणांमुळे मतदारांना पर्याय निवडणे अत्यंत कठीण झाले.

२,८६९ सदस्यांच्या निवडणुकीत, भाजपने एकट्याने १,४२० जागा जिंकल्या, तर शिंदे यांच्या सेनेने ३७५ जागा जिंकल्या. काँग्रेस ३२९ जागांसह तिसऱ्या क्रमांकावर आली. त्यांचा मित्रपक्ष असलेल्या वंचित आघाडीने ४० जागा जिंकल्या. ठाकरे आघाडीत, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने १७५ जागा जिंकल्या, तर राज ठाकरे यांच्या मनसेने फक्त १३ जागा जिंकल्या.

अजित पवारांच्या राष्ट्रवादीने १६० जागा जिंकल्या, तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीने फक्त ४० जागा जिंकल्या. भाजप एकटा किंवा मित्रपक्षांसह, २९ पैकी २५ मनपांत सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. त्यापैकी १८ मध्ये बहुमत मिळवले.

महाराष्ट्राच्या स्थानिक निवडणुकांतून एक गुंतागुंतीचा राजकीय दृष्टिकोन उघड झाला, दोन्ही बाजू एकमेकांच्या बाजूने आणि विरोधात होत्या. सर्वात अनोखी युती म्हणजे उद्धव आणि राज यांची, जे दशकांपासून एकमेकांचे कट्टर प्रतिस्पर्धी होते, भाजप-शिंदे सेनेच्या वर्चस्वाविरुद्ध एकत्र आले होते.

संयुक्त निवडणूक रॅलींद्वारे त्यांनी मराठी ओळख आणि बाळासाहेबांचा वारसा अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला, परंतु भाजप-शिंदे युतीचे गणित बिघडवण्यात त्यांना अपयश आले. काँग्रेस पक्षाला झालेला पराभव त्यांची दीर्घकालीन घसरण व सावरण्याची असमर्थतता दर्शवतो. २०१७ मध्ये मागील निवडणुकीत काँग्रेसने ३१ जागा जिंकल्या होत्या, २००७ मध्ये ७५ जागा जिंकल्या. ज्या २०१२ मध्ये ५२ आणि २०१७ मध्ये ३१ वर आल्या. काँग्रेसला आशा होती की वंचित आघाडीसोबत युती करून दलित आणि मुस्लिम मते एकत्रित करून बहुमत नाही मिळाले तरी २०१७ पेक्षा पक्ष चांगले प्रदर्शन करेल.

या निवडणुकांनी उद्धव यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या मुंबई महापालिकेतील वर्चस्वावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. ७० हजार कोटींपेक्षा जास्त बजेट असलेली बीएमसी ही भारतातील सर्वात श्रीमंत महापालिका आहे.

उद्धव यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने बीएमसीमध्ये २२७ पैकी ६५ जागा जिंकल्या, परंतु त्यांचा मित्रपक्ष मनसेच्या कमकुवत कामगिरीमुळे त्यांना पराभव पत्करावा लागला, ज्याला फक्त ६ जागा मिळाल्या. यामुळे या युतीच्या भविष्याबद्दल प्रश्न निर्माण झाले आहेत.

हे निकाल एक मजबूत संदेश देतात की बहुपक्षीय निवडणुकांमध्ये युती महत्त्वाची भूमिका बजावतात, कारण ते पक्षांना अतिरिक्त पाठिंबा मिळविण्यास मदत करतात. तथापि, युती देखील मर्यादित प्रमाणात निवडणूक यश मिळवू शकतात. दुसरे म्हणजे, ज्या समाजात मतदार त्यांच्या मुख्य ओळखींना प्राधान्य देतात, तेथे ओळखीचे राजकारण टिकून राहील.

राजकीय पक्ष जात, प्रदेश, धर्म आणि भाषा यासारख्या ओळखींद्वारे मतदारांना जोडण्याचा प्रयत्न करत राहतील, परंतु त्यांना मिळणारे फायदे मर्यादित आहेत. युती आणि ओळखीच्या राजकारणाच्या पलीकडे, निवडणुकीतील यशाची खरी गुरुकिल्ली विकासाचे आश्वासन आणि स्पष्ट रोडमॅप असल्याचे दिसून येते. आजचे अनेक मतदार याला महत्त्व देतात.

# मनोरंजनाची मेजवानी



नवीन वर्षाचा पहिला महिना संपताना सिनेरसिकांसाठी मनोरंजनाची मोठी मेजवानी घेऊन आला आहे. येत्या शुक्रवारी रोजी बॉक्स ऑफिसवर ऐतिहासिक महागाथा, हाय-व्होल्टेज क्राईम थ्रिलर आणि निखळ विनोदी चित्रपटांची मोठी टक्कर पाहायला मिळणार आहे. मराठी आणि हिंदी सिनेसृष्टीतील अनेक बिग बजेट चित्रपट एकाच दिवशी प्रदर्शित होत असल्याने प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. मराठी प्रेक्षकांना खळखळून हसवण्यासाठी पुन्हा एकदा 'साडे माडे तीन' हा चित्रपट सज्ज झाला आहे. अशोक सराफ, भरत जाधव आणि मकरंद अनासपुरे ही सदाबहार त्रिमूर्ती प्रदीर्घ काळानंतर एकत्र येत असल्याने या सिक्वेलबद्दल सोशल मीडियावर मोठी चर्चा आहे. जुन्या चित्रपटाचा वारसा जपत नव्या ढंगात मांडलेला हा विनोद प्रेक्षकांना चित्रपटगृहांकडे खेचून आणेल, अशी चिन्हे दिसत आहेत.

बॉलीवूडचा विचार करता, राणी मुखर्जी तिच्या दमदार 'मर्दानी ३' या चित्रपटासह पुनरागमन करत आहे. शिवानी शिवाजी रॉय ही कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी पुन्हा एकदा मानवी तस्करी आणि गुन्हेगारी जगताशी दोन हात करताना दिसेल. महिलांच्या सुरक्षिततेवर भाष्य करणारा हा क्राईम ड्रामा या आठवड्यातील हिंदीतील सर्वात महत्त्वाचा रिलीज मानला जात आहे. याचसोबत विजय सेतुपती आणि अरविंद स्वामी यांचा 'गांधी टॉक्स' हा आगळावेगळा मूकपट प्रदर्शित होत आहे. संवादांशिवाय केवळ अभिनयातून सामाजिक संदेश देणारा हा प्रयोग सिनेअभ्यासकांसाठी विशेष आकर्षणाचे केंद्र ठरला आहे.




एकाच दिवशी विविध धाटणीचे चित्रपट येत असल्याने थिएटर्समध्ये हाऊसफुल्लचे बोर्ड लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. प्रदर्शनापूर्वीच अनेक चित्रपटांचे अॅडव्हान्स बुकिंग सुरू झाले असून, जानेवारीचा हा शेवटचा आठवडा बॉक्स ऑफिससाठी लाभदायक ठरेल, असा अंदाज चित्रपट व्यापार विश्लेषकांनी व्यक्त केला आहे.

# प्रतिक्षा 'सुपर फ्रायडे'ची

चित्रपटगृहांप्रमाणेच आता ओटीटी प्लॅटफॉर्मवरही मोठ्या प्रदर्शनांची परंपरा रुळली असून, येत्या शुक्रवारी ३० जानेवारी २०२६ रोजी डिजिटल विश्वात मनोरंजनाचा मोठा पाऊस पडणार आहे. नेटफ्लिक्स, जिओ हॉटस्टार, प्राइम व्हिडिओ आणि सोनी लिव्ह यांसारख्या आघाडीच्या प्लॅटफॉर्म्सनी प्रेक्षकांसाठी सस्पेन्स, अॅक्शन आणि रोमान्सने भरलेला खजिना खुला केला आहे.



विशेष म्हणजे, या शुक्रवारी बॉलिवूडमधील बिग बजेट स्पाय थ्रिलर 'धुरंधर' थेट प्रेक्षकांच्या भेटीला येत असल्याने सोशल मीडियावर याची जोरदार चर्चा सुरू आहे.

या आठवड्यातील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे आदित्य धर दिग्दर्शित 'धुरंधर', रणवीर सिंह, सारा अर्जुन आणि आर. माधवन यांच्या मुख्य भूमिका असलेला हा चित्रपट भारतीय गुप्तचर यंत्रणेच्या एका साहसी मोहिमेवर आधारित आहे. नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणाऱ्या या हाय-व्होल्टेज स्पाय थ्रिलरमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे अॅक्शन सीक्वेन्स पाहायला मिळणार आहेत. 'उरी' फेम आदित्य धर यांच्या या महत्त्वाकांक्षी प्रोजेक्टबद्दल प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता आहे. त्याचप्रमाणे, जागतिक स्तरावर गाजलेली मालिका 'ब्रिजरटन' आपला चौथा सीझन घेऊन नेटफ्लिक्सवर पुनरागमन करत आहे. या सीझनमध्ये बेनेडिक्ट ब्रिजरटनची प्रेमकथा आणि लंडनमधील राजघराण्यातील गुपिते उलगडणार असून, जगभरातील चाहते या सीरिजची आतुरतेने वाट पाहत आहेत.

या व्यतिरिक्त, रिॲलिटी शोच्या चाहत्यांसाठी 'मास्टरशेफ इंडिया - हिंदी'चे नवीन भाग आणि 'एम टीव्ही स्प्लिट्सव्हिला'चे एपिसोड्स जिओ हॉटस्टारवर उपलब्ध होतील. थिएटर्समध्ये गर्दी असली तरी, घरबसल्या दर्जेदार साहित्याचा आस्वाद घेणाऱ्यांसाठी ३० जानेवारीचा हा शुक्रवार खऱ्या अर्थाने सुपर फ्रायडे ठरणार आहे. एकाच वेळी विविध भाषांमधील आणि वेगवेगळ्या जॉनरचे चित्रपट उपलब्ध होत असल्याने ओटीटी वापरकर्त्यांना निवडीसाठी मोठा वाव मिळणार आहे.

# बॉर्डर २ चा ऐतिहासिक धमाका

प्रजासत्ताक दिनाच्या मुहूर्तावर प्रदर्शित झालेल्या सनी देओलच्या बॉर्डर २ या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अक्षरशः त्सुनामी आणली आहे. सलग चार दिवसांच्या सुट्ट्यांचा (लॉंग वीकेंड) पूर्ण फायदा उठवत या चित्रपटाने भारतीय बॉक्स ऑफिसवर विक्रमी कमाई केली आहे. देशभक्तीचा ज्वर आणि सनी देओलचा पॉवरफुल परफॉर्मन्स यामुळे या चित्रपटाने अवघ्या चार दिवसांत १८५ कोटी रुपयांचा टप्पा ओलांडून वर्षातील पहिला ऑल टाइम ब्लॉकबस्टर होण्याकडे वाटचाल सुरू केली आहे.

चित्रपटाची सुरुवात शुक्रवारी ३० कोटींच्या दमदार ओपनिंगने झाली होती, मात्र खऱ्या अर्थाने रविवार आणि सोमवारी (२६ जानेवारी) चित्रपटाने वेगाची परिसीमा गाठली. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी या चित्रपटाने देशभरात तब्बल ६३.५ कोटी रुपयांचे निव्वळ कलेक्शन केले, जे कोणत्याही युद्धपटासाठी एका दिवसातील सर्वोच्च कलेक्शन मानले जात आहे. विशेषतः उत्तर भारत, महाराष्ट्र आणि पंजाबमध्ये अनेक ठिकाणी मध्यरात्रीचे शो देखील हाऊसफुल्ल होते. जागतिक स्तरावर या चित्रपटाने २५० कोटींचा आकडा पार केला असून, परदेशातील भारतीय प्रेक्षकांकडूनही याला मोठा प्रतिसाद मिळत आहे.



दुसरीकडे, दाक्षिणात्य चित्रपटांचा दबदबा अद्यापही कायम आहे. मेगास्टार चिरंजीवी यांचा माना शंकर वरप्रसाद गारू हा चित्रपट प्रदर्शित होऊन १५ दिवस झाले असूनही बॉक्स ऑफिसवर टिकून आहे. या चित्रपटाने आतापर्यंत भारतात १८८.२ कोटींची कमाई केली आहे. तर प्रभासचा बहुचर्चित द राजा साब हा चित्रपट १३५ कोटींच्या टप्प्यावर पोहोचला असून, तो लवकरच १५० कोटींचा आकडा गाठण्याची शक्यता आहे. या चित्रपटांनी मिळवलेले यश हे दाक्षिणात्य सिनेमांची पकड भारतीय प्रेक्षकांवर किती घट्ट आहे हे पुन्हा एकदा सिद्ध करत आहे. मराठी चित्रपटसृष्टीत क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम या चित्रपटाने आपल्या वेगळ्या विषयामुळे प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. मोठ्या हिंदी आणि दाक्षिणात्य चित्रपटांच्या स्पर्धेतही या चित्रपटाने २३.४ कोटी रुपयांचे समाधानकारक कलेक्शन केले आहे.

# 'रेशीमगाठ' ची जादू पुन्हा

झी मराठीवरील अत्यंत लोकप्रिय ठरलेली मालिका माझी तुझी रेशीमगाठ मधील श्रेयस तळपदे, प्रार्थना बेहरे आणि चिमुकली मायरा वायकुळ या त्रिकुटाने प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले होते. यश, नेहा आणि परीची ही केमिस्ट्री पुन्हा एकदा अनुभवण्याची इच्छा असलेल्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. हे तिन्ही कलाकार आता मर्दिनी या आगामी मराठी चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर एकत्र दिसणार आहेत.

माझी तुझी रेशीमगाठ मालिकेतील या कलाकारांच्या अभिनयामुळे ही मालिका घराघरात पोहोचली होती. विशेषतः श्रेयस आणि मायराचे बापा-लेकीचे नाते प्रेक्षकांना खूप भावले होते. आता मर्दिनी या चित्रपटातही हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत असून, त्यांच्यातील तोच जिव्हाळा आणि केमिस्ट्री पुन्हा एकदा पाहायला मिळणार आहे. नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर आणि काही क्षणचित्रे सोशल मीडियावर व्हायरल झाली असून, प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.



मर्दिनी हा चित्रपट केवळ एक कौटुंबिक कथा नसून, तो एका सामाजिक विषयावर भाष्य करणारा चित्रपट असल्याचे समजते. श्रेयस तळपदे आणि प्रार्थना बेहरे यांनी पुन्हा एकदा एकत्र काम करण्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे. मायरा वायकुळ हिची लोकप्रियता सोशल मीडियावर मोठी असून, तिच्या निरागस अभिनयाची झलक पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर पाहणे प्रेक्षकांसाठी पर्वणी ठरणार आहे.

श्रेयसने आपल्या सोशल मीडिया हँडलवरून या चित्रपटाचे अपडेट्स शेअर केले आहेत. चाहत्यांनी 'आमची लाडकी जोडी पुन्हा एकत्र येतेय,' अशा शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मालिकेप्रमाणेच हा चित्रपटही प्रेक्षकांचे भरभरून मनोरंजन करेल, असा विश्वास निर्मात्यांनी व्यक्त केला आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण झाले असून, लवकरच तो प्रदर्शित होण्याची शक्यता आहे.

# राधा पाटीलचा खुलासा

बिग बॉस मराठीच्या नव्या पर्वातून घराघरात पोहोचलेली आणि आपल्या बिनधास्त स्वभावामुळे चर्चेत राहिलेली नर्तिका राधा पाटील (राधा मुंबइकर) सध्या पुन्हा एकदा प्रकाशझोतात आली आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत राधाने तिच्या रिलेशनशिप स्टेटस आणि बॉयफ्रेंडबद्दल अत्यंत मोकळेपणाने भाष्य केले असून, तिच्या चाहत्यांसाठी हा मोठा चर्चेचा विषय ठरला आहे.

गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर राधाच्या खासगी आयुष्याबद्दल अनेक तर्कवितर्क लावले जात होते. अनेक चाहत्यांना ती कोणाला डेट करत आहे, याबाबत कुतूहल होते. या सर्व चर्चांना पूर्णविराम देत राधाने स्पष्ट केले की, ती सध्या एका हॅप्पी रिलेशनशिपमध्ये आहे. तिने तिच्या जोडीदाराबद्दल बोलताना सांगितले की, तो तिच्या आयुष्यातील एक अत्यंत महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. जरी तिने अद्याप आपल्या बॉयफ्रेंडचा चेहरा किंवा नाव अधिकृतपणे उघड केले नसले, तरी त्यांच्यातील बाँडिंग किती घट्ट आहे, याची प्रचिती तिच्या बोलण्यातून येते. राधा पाटील ही तिच्या मुंबइकर अंदाजात बनवलेल्या रील्ससाठी प्रसिद्ध आहे. तिने स्वतःहून आपल्या नात्याबद्दल कबुली दिल्याने तिचे चाहते तिचे अभिनंदन करत आहेत. अनेकांनी सोशल मीडियावर ''दादा कोण आहे?'' किंवा ''जोडी छान आहे'' अशा कमेंट्सचा पाऊस पाडला आहे. राधाने सध्या तिच्या करिअरवर लक्ष केंद्रित केले असले तरी, योग्य वेळ आल्यावर ती आपल्या जोडीदाराची ओळख जगाला करून देईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. बिग बॉसच्या घरातून बाहेर पडल्यानंतर राधाच्या लोकप्रियतेत मोठी वाढ झाली असून, आता तिच्या या वैयक्तिक खुलाशामुळे ती पुन्हा एकदा इंटरनेटवर ट्रेंड होत आहे.



# बिस्किट-पाण्यावर काढले दिवस

बॉलीवूडमध्ये आपल्या सहज अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकणारा अभिनेता विक्रांत मॅसी सध्या त्याच्या १२ वी फेल या चित्रपटाच्या यशामुळे आणि आगामी ओ रोमिओ या चित्रपटामुळे चर्चेत आहे. मात्र, आज यशाच्या शिखरावर असलेल्या विक्रांतचा इथपर्यंतचा प्रवास अत्यंत काट्याकुट्यांचा होता. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत त्याने आपल्या आयुष्यातील अशा एका कठीण टप्प्याचा उलगडा केला आहे. विक्रांतने सांगितले की, घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने त्याला वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी कामाला लागावे लागले होते. केवळ स्वतःचे शिक्षण सुरू ठेवता यावे आणि कुटुंबाला आधार मिळावा, यासाठी त्याने शिक्षणासोबतच दोन नोकऱ्या पत्करल्या होत्या. ''मला आजही तो दिवस आठवतो जेव्हा मी पहिल्यांदा कॅमेराला सामोरे गेलो होतो, पण त्याआधी मी काय केले आहे हे लोकांना माहीत नाही,'' असे विक्रांत भावूक होत म्हणाला.



खिशात पैसे नसायचे, त्यामुळे अनेक दिवस मी केवळ पार्ले-जी बिस्किट आणि पाणी पिऊन काढले आहेत. साध्या चहासाठीही खिशात पैसे नसायचे,'' असा खुलासा त्याने केला. विक्रांतने यापूर्वीही एका मुलाखतीत सांगितले होते की, जेव्हा त्याची आर्थिक स्थिती बिघडली आणि ते जुहू येथील घर सोडून गोदामासारख्या ठिकाणी राहायला गेले, तेव्हा त्याच्या अनेक जवळच्या मित्रांनी त्याच्याशी बोलणे बंद केले होते. घराची दुरवस्था पाहून मित्र त्याची थट्टा करायचे. मात्र, याच संघर्षातून त्याने प्रेरणा घेतली आणि आज तो चित्रपटसृष्टीतील एक महागडा अभिनेता म्हणून ओळखला जातो.

टीव्ही मालिकांपासून करिअरची सुरुवात करणाऱ्या विक्रांतने बालिका वधू आणि कुबूल है सारख्या शोमधून ओळख मिळवली. त्यानंतर त्याने आपला मोर्चा चित्रपटांकडे वळवला. १२ वी फेल चित्रपटातील त्याच्या अभिनयासाठी त्याला राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आले आहे. विक्रांतच्या मते, त्याचे हे संघर्षाचे दिवसच त्याला आजही जमिनीवर पाय ठेवून काम करण्याची प्रेरणा देतात.

# सस्पेन्सचा तगडा डोस!

अलिकडच्या काळात ओटीटी प्लॅटफॉर्मवर गुन्हेगारी आणि तपास यंत्रणांच्या कामकाजावर आधारित वेब सीरिजची मोठी लाट आली आहे. अलीकडेच प्रदर्शित झालेल्या तस्करी या वेब सीरिजने आपल्या वेगवान कथानकामुळे प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. जर तुम्हाला ही सीरिज आवडली असेल आणि तुम्ही अशाच प्रकारच्या थरारक कथांच्या शोधात असाल, तर ओटीटीवर काही उत्तम पर्याय उपलब्ध आहेत. सस्पेन्स, थ्रिल आणि क्राईम ड्रामा आवडणाऱ्यांसाठी मानवत मर्डर्स पासून ते स्पेशल ऑप्स पर्यंतचे हे ५ शो आवर्जून पाहण्यासारखे आहेत.

मानवत मर्डर्स – ही अत्यंत चर्चिलेली वेब सीरिज १९७० च्या दशकात महाराष्ट्रात घडलेल्या सत्य घटनांवर आधारित आहे. प्रसिद्ध पोलीस अधिकारी रमाकांत कुलकर्णी यांनी मानवत येथील हत्याकांडाचा शोध कसा लावला, याचे अत्यंत वास्तववादी चित्रण यात करण्यात आले आहे. आशुतोष गोवारीकर आणि सई ताम्हणकर यांच्या दमदार अभिनयाने ही सीरिज एका वेगळ्या उंचीवर नेली आहे.

स्पेशल ऑप्स– देशभक्ती आणि गुप्तचर यंत्रणेचे कार्य आवडणाऱ्यांसाठी के. के. मेनन स्टारर स्पेशल ऑप्स हा एक उत्तम पर्याय आहे. संसदेवरील हल्ल्याच्या मास्टरमाइंडला पकडण्यासाठी चाललेली १५ वर्षांची शोधमोहीम यात अत्यंत चित्तथरारक पद्धतीने मांडली आहे.

खाकी: द बिहार चॅप्टर – बिहारमधील गुन्हेगारी आणि एका प्रामाणिक पोलीस अधिकाऱ्याचा संघर्ष यावर ही सीरिज भाष्य करते. तस्करी प्रमाणेच यातही पोलीस आणि गुन्हेगार यांच्यातील थरारक पाठलाग पाहायला मिळतो.

दिल्ली क्राईम – वास्तववादी क्राईम ड्रामा पाहण्याची आवड असेल तर दिल्ली क्राईम हा एक उत्कृष्ट पर्याय आहे. गुन्ह्याचा तपास करताना येणाऱ्या प्रशासकीय अडचणी आणि पोलिसांची मानसिकता प्रभावीपणे दाखवली आहे. या सीरिजला आंतरराष्ट्रीय एमी पुरस्कारही मिळाला आहे.

अरण्यक – रवीना टंडनची मुख्य भूमिका असलेली ही सीरिज हिमाचल प्रदेशातील एका काल्पनिक शहरात घडते. एका गूढ हत्येचा तपास करताना जुन्या लोककथा आणि वास्तव यांची झालेली सरमिसळ प्रेक्षकांना शेवटपर्यंत खिळवून ठेवते.



हे सर्व शो सध्या विविध ओटीटी प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असून, तस्करीमधील अॅक्शन आणि सस्पेन्स मिस करणाऱ्या प्रेक्षकांसाठी ही एक मोठी मेजवानी ठरेल. सुट्ट्यांच्या दिवसात किंवा वीकेंडला बिंज-वॉच करण्यासाठी हे पर्याय सर्वात वरच्या क्रमांकावर आहेत.